# वशाचं वशीकरण

प्रथम पुरस्कार प्राप्त नाटक



विजय वाटाणे

# वशाचं वशीकरण

( विनोदी २ अंकी फार्स )

विजय वाटाणे

**प्रभा प्रकाशन**

३३ रामकृष्ण नगर, खामला रोड, नागपूर -१५

**प्रकाशक**: समीर ग. देशमुख
प्रभा प्रकाशन
३३ रामकृष्णनगर, खामला रोड,
नागपूर - १५

**मूल्य** : रुपये वीस फक्त

प्रथमावृत्ती १६-५-१९९४

(C) सौ. विजया वाटाणे
१२२ सुरेंद्रनगर नागपूर -१५

**अक्षर जुळवणी** : अभय हरसुलकर
इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नालॉजी
विश्वभारती प्रकाशनचे जवळ
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर

या नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी परवानगी घेणे आवश्यक
DRM No. ७६८/७७ दि. १८-१०-७७

अभय, सुषमा व महेश
यांना

## वशाचं वशीकरण नाटक करण्यापूर्वी

**नम्र विनंती :**

हा फार्स आहे हे निर्विवाद, कारण वशीकरण अजून सिध्द झालेलं नाही. पण नाटकातले वशीकरण कार्य करते आहे. हे प्रेक्षकांना पटावे. पात्रांना त्याबद्दल संशय आहे. त्यामुळे नाटकांत ज्या घटना घडतात त्याचं तार्किक विश्लेषण पात्रांजवळ तयार आहे. अन् ही गंमत प्रेक्षक हसऱ्या चेहऱ्यानं पहात असतात. नाटकातील पात्र म्हणून मुद्दामच विदुषकी थाटानं वागत नाहीत. कारण त्यांची सुखदुःख , फसवणूक , गैरसमज, त्यांच्या जीवनावर परीणाम करणारी आहेत. हे सर्व लक्षात घेऊन फार्स बसवावा. ही नम्र विनंती.

**— लेखक**

## पात्र परिचय (प्रवेशानुसार)

**वसंता :** कायम नौकरी असणारा मध्यमवर्गीय कारकून, भिडस्त, लाजरा, श्रध्दाळू.

**अनंता :** पदवीधर बेकार, तरीपण आनंदी, स्मार्ट, बुध्दीवादी, प्रसंगावधानी.

**अंबू :** मंद बुध्दीची प्रौढ कुमारीका, दुसऱ्याच्या विचारानं चालणारी

**अकल्पिता :**आजची मॉडर्न तरुणी, श्रीमंतीत वाढल्यामुळे जरा लाडावलेली, लहरी पण न बिघडलेली.

**डॉक्टर :** रोगाचं कारण समजो न समजो टोचून देणारा, पैशासाठी.

**नाना :** घरमालक, अत्यंत व्यवहारी, स्वतःच्या मुलीच्या रुपाची जाणीव असलेले, धोरणी.

**नानी :** भावना प्रधान, घरमालकीणीचा तोरा मिरविणारी, स्वतःच्या प्रतिष्ठित पणाच्या इतक्या मोठया कल्पना की त्यामुळे मुलीच्या रुपाची जाणीव बोथट झालेली. तिच्यासाठी तोलामोलाचं स्थळ पाहणारी.

**लोचट :** नावाप्रमाणे

**अरुणा :** नौकरी करणारी सुशिक्षित तरुणी, अनंतावर निस्सीम प्रेम करणारी - त्याची बेकारी नजरे आड करुन.

**महाराज** :मंत्र विद्येवर खरोखरच विश्वास असणारे. पण भोंदू नाहीत. बुवाबाजी न करणारे.

**पाटील** : आडदांड - शरीरानं आणि मनानं.

**बाबासाहेब** : अकल्पितेचे वडील, गॅझेटेड ऑफिसर, समजूतदार.

हया नाटकांचा प्रयोग विदर्भ साहित्य संघाच्या कै. रघुनाथराव आष्टीकर विनोदी नाटक स्पर्धेत झाला व त्याला लेखनाचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

हनुमान नगर महिला मंडळानी केलेल्या नाटय प्रयोगातील कलावंतांची नावे

वसंता - विनोद देशमूख
अनंता - जतींद्र नाकाडे
अंबू - सौ. नीला कठाळे
अकल्पिता - कु. सुषमा वाटाणे
डॉक्टर - अभय वाटाणे
नाना - विजय वाटाणे
नानी - सौ. आशा दारव्हेकर
लोचट - प्रभाकर गाडे
अरुणा - कु. रंजना कुसरे
महाराज - छोटू पवार
पाटील, बाबासाहेब वगैरे

* * *

# वशाचं वशीकरण

(**स्थळ** - दोन खोल्यांचा ब्लॉक, स्टेजवर बैठक कम बेडरुम, प्रेक्षकांच्या उजवीकडून बाहेरुन आंत येण्याचे दार, डावीकडे किचनमध्ये जाण्याचे दार, समोरच्या भिंतींत मध्यभागी एक खिडकी, खिडकीतून झाडाचा शेंडा दिसतो. वीजेच्या तारा दिसतात. त्यावरुन हा ब्लॉक पहिल्या मजल्यावर आहे हे कळून यावे. तसंच खिडकीखालून वाहता रस्ता आहे हेहि कळून यावे. डाव्या भिंतीजवळ एक कॉट. त्यावर गादी पसरलेली, चादर अस्ताव्यस्त, उजव्या बाजूला टेबल. त्यावर एक दोन पुस्तकेफिल्मफेअर वगैरे, पाणी पिण्याचा जग, टेबलाजवळ एक खुर्ची. खिडकीजवळ एक खुर्ची, एक स्टूल (खुर्चीसमोर) सिनेमा नटीचे एक भडक कॅलेंडर. एका कोपऱ्यात आडवी दोरी. त्यावर कपडे टावेल वगैरे लोंबकळताहेत.

**वेळ** :- शनिवार, सायंकाळचे सहा.

पडदा उघडतो त्यावेळी वसंता टेबलाजवळच्या खुर्चीच्या पाठीला ताईत बांधून ठेवण्याच्या खटपटीत आहे. तोंडाने गाणं, "माझी होशील का... होशील का ... होशील का"... ताईत बांधल्यावर खुर्चीवर बसून पाहतो. मग समाधान झाल्यासारखा चेहरा करतो, उठतो. कॉटवर बसतो. गुणगुणणं चालूच. उशी खालचा फोटो काढतो. डोळया समोर धरतो----).

**वशा :** अकल्पिते। माझ्या हृदयाची स्वामीनी। मेरे जिगरके टुकडे। आता तू मला कुठवर हुलकावण्या देशील? आपल्या मादक नजरेच्या बाणानं माझ्या हृदयाचे हजारो तुकडे करुन त्यांना सुकुमार पावलांनी तुडवीत चालणाऱ्या फत्तर हृदये। आता तुला माझ्या पायाशी लोळण घ्यावीच लागेल. आजपर्यन्त माझ्या प्रेमाची दखल सुध्दा न घेणाऱ्या गर्वीष्ठ पोरी तुला आता माझ्यावर प्रीती करावीच लागेल. धावत येऊन माझ्या गळयाला मिठी मारावीच लागेल. पदर पसरावा लागेल. प्रेमाची भीक मागावी लागेल --- हया वशाचं वशीकरणच तसं जबरदस्त आहे. बस्स। एकदा तुला त्या ताईताचा स्पर्श झाला की मग गड काबीज झालाच म्हणून समज. त्यानंतर जो पहिला पुरुष तुझ्या दृष्टिला पडेल त्याची तुला मोहीनी पडलीच म्हणून समज। महाराजांनी तशी खात्रीच दिली

आहे. अन् तो पहिला पुरुष मीच असेन... (मूड बदलतो).. प्रिये। रागावू नकोस. पण तुझे प्रेम मिळविण्यासाठी मला हा प्रयोग करणं भागच पडलं-- कारण --- कारण त्या शिवाय तुझ्यासारख्या रुपगर्वितेचं आणि श्रीमंत बापाच्या लाडावलेल्या लेकीचं माझ्यासारख्या फाटक्या कारकूनाकडे लक्ष जाणार कंसं? मला हे कळत का नव्हतं? पण प्रिये, कुणाच्या प्रेमात पडावं हे काय कुणाच्या हातात आहे. तुझं प्रेम मिळविण्यासाठी मी काय, कमी धडपड केली --- पण हाय --- साध्या मैत्रीपलीकडे पाऊल सरकेना. मग मी काय करावं? जीव द्यावा? होय। तोच द्यायला गेलो होतो मी --- भैरंबुवाच्या कड्यावर.... उडी घ्यायला.... पण तिथं गुरुमाऊली भेटली अन् तिनं मार्ग दाखवला (अनंता आत येतो) अहाहा। माऊली मानलं तुला। माऊली (डोळे मिटतो)

**अनंता :** (फोटो हिसकवून घेत)ऑ। अकल्पिता आणि माऊली? म्हणजे वशा अकल्पितेचं वेड तू सोडलंस?

**वशा :** अंत्या। लेका, माझ्या निस्सिम प्रेमाला वेड म्हणतोस?

**अनंता :** म्हणत होतो. पण तू आता तिला माऊली समजायला लागला तेव्हा तू आता ताळ्यावर आलास ही खात्री पटलीय.

**वशा :** माऊली! धन्य आहे तुमच्या अकलेची। अरे। अकल्पितेला माऊली मानण्याच्या अगोदर मी जीव नाही का देणार?

**अनंता :** मग तो मघाचा जप?

**वशा :** (अत्यादरानं) माझे परमपूज्य गुरु.. आचार्य प्रेमानंद।

**अनंता :** हा कोण बुवा प्रेमानंद? अन् तुला कुठं याचं दर्शन घडलं?

**वशा :** (भावना तिरोकानं) कड्यावर!

**अनंता :** कड्यावर? आपल्या शहरा बाहेर असलेल्या भैरंबुवाच्या पाहाडाचाकडा.

**वशा :** हो!

**अनंता :** तिथं तू कशाला गेला होतास - मरायला?

**वशा :** मरायलाच.

**अनंता :** ऑ! (खिडकीजवळच्या खुर्चीवर दाणकन बसतो)

**वशा :** (शांतपणे) मरायलाच गेलो होतो - आत्महत्या करायला.

**अनंता :** अरे पण कां? एवढा का वर जीव आला तुझा?

**वशा :** जीव वर आला नाही. जीव जडलाय – अकल्पितेवर – म्हणून..

**अनंता :** म्हणून? (एकदम लक्षात आलं आहे. खूर्चीवरुन उठतो. कॉटवर बसलेल्या वशाकडे येतो. पाठीवर हात ठेवून कृत्रिम सहानुभूतीनं) वशा! अकल्पितेनं ठोकरलं तुला ? अरेरे!

**वशा :** कीव करण्याची गरज नाही अंत्या?

**अनंता :** कीव करु नको? (आवेशानं) माझा जिवश्च कंठश्च मित्र वशा उर्फवसंता जडबुध्दे एका मुलीवर मरु लागला आहे. त्याच्या प्रेमाचा अव्हेर करुन त्याला शद्बशः मरणाची वाट दाखविल्या गेल्यावर त्याची कीव करु नको तर... ...(एकदम प्रकाश पडल्यासारखा) येस करेक्ट। कीव करण्याचा प्रश्नच नाही. सूड! सूड! सूड घ्यावयास पाहिजे तिचा - खडसाऊन विचारतो पहिले तिला... आमच्या वशात काय कमी आहे म्हणून... आपल्या बापाच्या पैशावर माजलेल्या मस्तवाल कारटे कुठाय तूं?... ये अशी समोर ये...

**वशा :** (शांतपणे) येणारच आहे ती इतक्यात... इथे (रिस्टवॉचकडे बघत) सात वाजत आले.

**अनंता :** (एकदम खलाश) इथे? 'आता'? सात वाजता?

**वशा :** हो इथे... सात वाजता. निघालीच असेल घरुन..

**अनंता :** म्हणजे तिचं मन पालटलं की काय?

**वशा :** इथे आल्यावर पालटेल.

**अनंता :** वशा? तुझा मजनू केव्हापासून झालारे --- म्हणे इथे आल्यावर पालटेल. अशी कोणती किमया तू करणार आहेस?

**वशा :** किमयाच करणार आहे. पाहशीलच तू आता .... (खूर्चीकडे सहेतूक पाहतो)

**अनंता :** (गोंधळलेला) कशाची किमया? कोणी शिकवली?

**वशा :** आचार्य प्रेमानंद महाराजांनी!

**अनंता :** वशा! वशा! तू शुध्दीवर आहेस कां? की झोकली आहेस हातभट्टीची?

**वशा :** मी वसंता जडबुध्दे, देवाची शपथ घेऊन राजीखुषीने अक्कलहुषारीने काहीही नशापाणी न करता बयाण देत आहे की ...

**अनंता :** (खेदानं) अरेरे! एका चांगल्या मित्राला मी मुकलो --- अकल्पिते! अकल्पिते! शेवटी तू माझ्या मित्राला जीवनातून उठवलंस ना? (अतिशय वाईट चेहरा करीत टेबलाजवळच्या खूर्चीत बसतो. काहीतरी पाठीला टोचल्यासारखा पुन्हा ताडकन उठतो.)

**अनंता :** ढेकूण?

**वशा :** नाही ताईत..

**अनंता :** (खुर्चीची पाठ निरखून पहात) येस टोकदार ताईत..

**वशा :** मी बांधला.

**अनंता :** खुर्चीच्या पाठीला? कशाकरता?

**वशा :** टोचावा म्हणून.

**अनंता :** टोचावा म्हणून? पण कां?

**वशा :** अरे अंत्या - तेच सर्व सांगण्याकरता मी मघापासून धडपडतोय- पण तू नीट सविस्तर सांगू देशील तर ना? हा ताईत....

**अनंता :** तुला प्रेमानंद महाराजांनी दिला - मार थापा.

**वशा :** थापा नाही! खरंच ! त्यांनीच दिला - फक्त त्याला थोडं टोकदार मी बनवलंय!

**अनंता :** टोचावा म्हणून?

**वशा :** करेक्ट.

**अनंता :** अरे पण कां?

**वशा :** तुला सगळंच सविस्तर सांगतो. हया खुर्चीवर शांतपणे बैस. टेकू नकोस. टोचेल (अनंता खुर्चीवर बसतो. वशा उभा राहतो. त्याच्या खांद्यावर हात ठेवून सांगू लागतो) तुझा विश्वास बसणार नाही....

**अनंता :** तू सांगू लाग -- विश्वास ठेवायचा की नाही ते मी नंतर पाहीन.

**वशा :** तुला माहीतच आहे. अकल्पितेचे नि माझे संबंध मैत्रीच्या पुढची पायरी ओलांडायला तयार नव्हते. तेव्हा पुरता निराश होऊन मी शेवटी आत्महत्येचा विचार निश्चित केला. तशी चिठ्ठी खिशांत ठेवली अन् भैरंबुवाच्या कड्यावर उडी मारायला गेलो.

**अनंता :** मग माशी कुठं शिंकली? ते प्रेमानंद महाराज आडवे पडले कां?

**वशा :** अंत्या! महाराजांची अशी टवाळी करायची असेल तर इथून चालता हो। तुझी नी माझी मैत्रीची गाठ तुटली समज.

**अनंता :** बरं बुवा! चालू दे तुझं!

**वशा :** प्रेमानंद महाराज देवळाच्या ओट्यावर बसले होते. मी उडी मारणार इतक्यांत त्यांनी माझ्या कमरेला विळखा घातला. अन् मला ओढलं - मागे.

**अंत्या :** पुढे ..

**वशा :** पुढे काय? माझी सर्व व्यथा मी त्यांना सांगितली. तसे ते हसतच सुटले..

**अंत्या :** हास्यास्पद आहेच सगळं - तुझे प्रेमप्रकरण म्हणतो मी...

**वशा :** नंतर म्हणाले. एखाद्या पोरीसाठी जीव देतो. थूं तुमच्या जीनगानीवर! अशा पन्नास पोरी तुला मिळवून देतो, बोल.

**अंत्या :** पन्नास नको, एकच हवी.

**वशा :** बरोबर! मी हेच म्हणलो?

**अंत्या :** मग ते काय म्हणाले?

**वशा :** म्हणाले कांहीच नाही! हा ताईत दिला.

**अंत्या :** आणि हा ताईत घेऊन बाळ घरी परतलं ....

**वशा :** अंत्या! पोरकट पणा पुरे कर! अरे महाराजांनी हा ताईत मंत्रून दिंला आहे. फार पॉवरफुल आहे तो. एकदा का एखाद्या तरुणीला हयाचा स्पर्श झाला की बस्स. खलाश ..

**अनंता :** म्हणजे खतम?

**वशा :** म्हणजे नंतर ती ज्या पुरुषाला प्रथम पाहील तिच्यावर प्रेम करु लागेल असं -

**अनंता :** असं प्रेमानंद महाराज म्हणाले ...

**वशा :** होय!

**अनंता :** अन् तू विश्वास ठेवलास! गाढव आहेस.

**वशा :** गाढव तू आहेस. अरे! घोडा मैदान आता जवळच आहे. कळेलच लवकर ताईताचा प्रभाव!

**अनंता** : अरे हो! तुझी ती अकल्पिता येणार आहे आता इथे. हो नां?
**वशा** : येस माय डिअर ..
**अनंता** : अन् तिला तू या खुर्चीत बसविणार!
**वशा** : सेंट पर्सेन्ट करेक्ट ..
**अनंता** : मग तिला तो ताईत टोचणार ..
**वशा** : आहे! अक्कल आहे तुला! थोडीशी.
**अनंता** : अन् ती तुझ्याकडेच पाहणार ..
**वशा** : नॅचरली ...
**अनंता** : अन् मग ती मंत्राच्या प्रभावानं तुझ्या प्रेमात पडणार ..
**वशा** : प्रेमानंद महाराज की जय!
(आनंदानं डोळे मिटतो. त्याला दाणकन् कॉटवर आदळीत)
**अनंता** : वशा शुध्दीवर ये..
**वशा** : आलो ..
**अनंता** : आणि एका शंकेचं उत्तर दे ..
**वशा** : शंखा! विचार शंका ..
**अनंता** : आणि समज तिनं प्रथम माझ्याकडे पाहिलं तर?
**वशा** : (वेडावीत) म्हणे माझ्या कडे पाहिलं तर.... अनंतराव त्यावेळी आपण इथं असणार नाही.
**अनंता** : वसंतराव! आपण इथंच राहणार! कलियुगातील हा एकमेव चमत्कार पाहण्यासाठी. वशांचं वशीकरण पडताळून पाहण्यासाठी.
**वशा** : त्यासाठी आताच इथे थांबण्याची कांही गरज नाही. उद्या आम्ही दोघं जोडीनं तुला भेट द्यायला येऊ. तुझ्या खोलीवर . सकाळी.
**अनंता** : माझी खोली? बापरे. बरी आठवण झाली..
**वशा** : कशाची ... ... ..
**अनंता** : आज तीस तारीख ना?
**वशा** : हो! आजच पगार मिळाला. पण लक्षात ठेव! पैसे मिळणार नाही. मागचेच सव्वाशे रुपये परत करायचे आहेत तुला.
**अनंता** : पैसे को मारो गोली..
**वशा** : तू मारली म्हणून मी कशी मारु? पैसे माझे गेले आहेत ना.

**अनंता :** तसं नव्हे रे. माझी चिंता हे पैसे परत करण्यापेक्षा फार मोठी आहे.

**वशा :** कोणती? अरुणाशी कांही बिनसलं कां?

**अनंता :** ती कांही फार मोठी बाब नाही रे. आतापर्यन्त हजारदा बिनसलंय आणि हजारदा जमलंय. बरी आठवण झाली. आज शनिवार ना. आज आम्ही नाटकाला जाणार आहोत. दोघं. नऊच्या शोला. तिनंच टिकीटं काढली दोघांची. सरळ थिऐटरवरच येणार आहे ती.... ..

**वशा :** भाग्यवान आहेस बाबा! आमचं अजून जमायलाच ठिकाणा नाही. ...ते जाऊ दे. कशाची चिंता म्हणतोस?

**अनंता :** माझी खोली गेली!

**वशा :** खोली गेली? कुठं?

**अनंता :** मसणांत! अरे खोली गेली म्हणजे घर मालकानं काढलं मला घराबाहेर! सहा महिन्याचं भाडं तुंबल्यावर तो तरी काय करणार बिचारा.

**वसंत :** अच्छा! म्हणजे तुमचा मुक्काम आता आमच्या खोलीवर.

**अनंत :** (पाय पकडतो)महाराज! दासाला क्षमा असावी. परंतू प्राप्त परिस्थितीत आपल्या आश्रयास येण्यावाचून दूसरा मार्ग नव्हता. दासाला आपल्या पायापासून दूर लोटू नका. निदान दूसरी खोली मिळेपर्यन्त.

**वसंत :** ठीक आहे। पण एका अटीवर.

**अनंत :** दासाला अट कळवावी. दास आपल्या इच्छेबाहेर नाही.

**वसंत :** आमच्या भावी राणीसाहेब आता इथे येतील. त्यावेळी तू इथे असता कामा नये.

**अनंत :** आज्ञा महाराज.

(इतक्यात दार ठोठावल्याचा आवाज ऐकू येतो. दोघेही उठून उभे राहतात.)

**वसंत :** आली! अकल्पिता आली! अंत्या पळ इथून ...

**अनंत :** अरे कुठे पळू! दरवाज्यात तर तीच उभी असेल.

**वसंत :** हो! खरंच पण अजून तिला ताईताचा स्पर्श झाला नाही! तेव्हा तशी काही भिती नाही.

**अनंत :** अरे पण ती आल्यावर मी लगेच निघून जाणं वाईट दिसेल रे.

तुझा मित्र म्हणून ती मला ओळखते.

**वसंत** : कांहीतरी सबब सांग. अर्जन्ट.

**अनंत** : लेकिन वश्या! हमकू तुम्हारा प्रयोग देखने को मंगता यार! मै इधर किचन में , घुसता और खामोशीसे देखता.

**वसंत** : बरोबर! घुसो जल्दी और बाहर आनेकु नही मंगता। (अनंता तुम फिकीर मत करो यार ... म्हणत स्वयंपाक घरात जातो आणि वसंता केसावरुन हात फिरवित उत्साहाने दार ऊघडावयास जातो. दार उघडतो. दारात घरमालकाची मुलगी अंबू उभी दिसते. काळी, स्थूल अन् बावळट, वसंताचा अपेक्षा भंग, उसन्या उत्साहाने तिचे स्वागत करतो).

**वसंत** : कोण अंबू! ये ना! ये! आत ये! नानांनी पाठवलं असेल तुला भाडं वसूल करायला..

**अंबू** : (आंत येत) नाही. तसं नाही. पण नाना म्हणाले वसंतराव आले असतील - दमून - भागून. जरा त्यांची विचारपूस कर .काय चहापाणी हवं असेल तर करुन दे त्यांना...

**वसंत** : आणि जमल्यास भाडंहि वसूल करुन घे..

**अंबू** : (रागाने) इतके काही आमचे नाना पैशाचे लोभी नाहीत बरं का. त्यांना माणसांचा फार लोभ आहे. नेहमीच मला ते तुमची विचारपूस करायला पाठवित नाही का? अधून मधून।

**वसंत** : (स्वगत) ते तुला कशाला पाठवतात माझ्याकडे हे न कळण्या इतकं माझ्या डोक्याचं खोकं झालं नाही.

**अंबू** : काय हो कसल्या विचारात आहांत?

**वसंत** : छे, छे! विचार कसला. पण काय ग अंबू? नानासाहेब माझ्याकडे फार क्वचित येतात. बहुधा तुलाच पाठवतात काय हवं नको पाहायला. असं का? नाही म्हणजे नानांना माणसांचा लोभ आहे. असे तू म्हणतेस म्हणून म्हणतो.

**अंबू** : (एकदम लाडिक) तुम्ही तरी अस्से शब्दात पकडता. जसं काही माहीतच नाही. त्यांना ब्लडप्रेशर नाही कां? म्हणून जिना चढायचं टाळतात ते शक्यतोवर.

**वसंत** : असेल, असेल, तर तुला मी भाडं देतों [illegible] नंतर

पाठविली तरी चालेल.

**अंबू :** द्या ना सावकाश. काय घाई आहे?

**वसंत :** घाई! ( रिस्टवॉच कडे पाहतो ) घाई तशी नाही पण आपलं देणं देऊन टाकलेलं बरं नाही कां?

**अंबू :** एवढं देण्या घेण्याची भाषा करण्याची गरज नाही म्हटलं. आम्ही एवढ्यानी आपलं म्हणून येतो, तर तुमच्याकडून साधं या बसा म्हणणं सुध्दा होत नाही.

**वसंत :** छे छे असं नाही ! ये ना. बस ( तिने टेबला जवळच्या खुर्चीवर बसू नये म्हणून तो खिडकीजवळची, खुर्ची उचलून तिच्या समोर ठेवणार इतक्यात अंबू टेबलाजवळच्या खुर्चीत आगावूपणे जावून बसते. ती बसते, ताईत टोचतो. अंबू ताठ. घुमणारे संगीत. नंतर ताडकन उठते आणि खुर्ची घेऊन उभ्या असलेल्या वसंताकडे पाहून 'प्रियकरा' अशी साद घालत वसंताला मिठी मारावयास धावते. वसंताला सर्व कळून तो घाबरतो आणि खुर्ची समोर करतो. अंबूच्या समोर केलेल्या हाताच्या मिठीत खुर्ची येते. खुर्ची सोडून वसंता खोलीभर पळू लागतो. हातात आलेली खुर्ची टाकून देऊन वसंताच्या मागे अंबू धावू लागते. तोंडाने बडबडू लागते.)

**अंबू :** असं हो काय करता? माझ्या पासून दूर कां पळता? मला पदरात घ्या वसंतराव! मला पदरात घ्या. असे फसवू नका. माझे तुमच्यावर फार प्रेम आहे हो! (ती त्याला धरणार इतक्यात तो तिला ढकलून देतो आणि ओरडतो).

**वसंत :** मेलो! मेलो! अंत्या धाव ...

**अंबू :** (पडलेल्या अवस्थेत गळा काढते) नाना .. मला फसविलं.. नाना धावा ..आपल्या अंबूला वाचवा हो...

**वसंत :** ओरडू नकोस महामाये ..

**अंबू :** (अजून जोरात सुर काढते) नाना ..ऽ ऽ ऽ

**वसंत :** अंबे! जगदंबे! गळा काढू नकोस. तुझ्या पाया पडतो. (पाया पडावयासजातो)

**अंबू :** (एकदम उठून) नाथ हें काय बरं? दासीच्या तुम्ही पाया पडणार?

देवा रे देवा! मग मी हे पाप कुठं फेडू?

**वसंत :** (रडव्या सुरात) मग मी करु तरी काय?

**अंबू :** मला पदरात घ्या (जवळ जाऊ लागते)

**वसंत :** आई जगदंबे! जवळ येऊ नकोस. दूर राहूनच प्रेम कर. अंत्या! अंत्या! कुठं मेलास तूं?

**अनंता :** (आतूनच) मी जिवंत आहे. तुझं चालू दे. गो अहेड. डरो मत पट्ठे.

**वसंत :** (स्वगत) बापरे! हा अंत्या पण ऐनवेळी अवसानघात करायला निघाला. आता आपणच कांहीतरी युक्ति काढली पाहिजे आणि गळ्यात पडलेले हे अंबुचं लोढणं दूर केलं पाहीजे. सध्या तरी. अकल्पिता यायच्या आंत (दूर राहून मुसमुसत उभी राहणाऱ्या अंबूजवळ जाऊन प्रेमळ सुरांत) अंबू हे काय बरं? अगं साधी गंमत तुला कळत नाही. पूस-पूस ते डोळे.. .. ..

**अंबू :** (डोळे पदराने पुसत) नाथ! माझा स्वीकार करणार ना!

**वशा :** अगदी डोळे मिटून!

**अंबू :** अगदी खरं?

**वशा :** वचन देऊ की स्टॅम्प वर लिहून देऊ?

**अंबू :** एवढं काही नको करायला. एकदा नानांसमोर कबूल करा की झालं.

**वशा :** नानासमोर! बापरे! त्यापेक्षा एखाद्या नरभक्षक वाघासमोर उभं रहायला कां सांगत नाही? ( थरथर कापत असल्याचं सोंग आणतो)

**अंबू :** (एकदम जवळ येत लाडिक) इतके कांही आमचे नाना रागीट नाहीत बरं का! उलट --

**वशा :** अंबू! अंबू तू खात्री देऊ नकोस. अगं कितीहि शेळपट बाप असला ना तरी तो सुध्दा आपल्या पोरीचं प्रेमप्रकरण समजलें तर वाघासारखा डरकाळ्या फोडू लागतो.

**अंबू :** म्हणजे माझे नाना शेळपट आहेत वाटतं!

**वशा :** अगं तुझ्या आईसमोर सिंह सुध्दा गवत खाऊ लागेल.

**अंबू :** (हसू लागते) कित्ती कित्ती विनोदी स्वभाव आहे हो तुमचा म्हणूनच मला तुम्ही इतकेआवडता, इतकेआवडता की .....

**वशा :** हं! हं! अंबे दूर हो. मुलीच्या जातीनं कसं मर्यादाशील असावं! वचन दे! लग्नाआधी मर्यादा सोडायची नाही म्हणून. अंगटीस यायचं नाही...

**अंबू :** हे हो काय नाथ। मनानी मी तुमचीच नाही कां?

**वशा :** हो. पण सध्या एवढंच पुरे! आणि दुसरं वचन दे. आपलं हे गुपित इतक्यांत कुणाला सांगायचं नाही. काय?

**अंबू :** आम्ही नाही जा! ( भयानक लाजते)

**वशा :** आणि आता तू जा. (दोन्ही हात कोपरापासून जोडतो. आतून अनंता जोरात हसतो).

**अंबू :** अगबाई! आत कोण आहे?

**वशा :** (गडबडून) आंत ना आपला हा - - -

**अनंता :** (बाहेर येत) वहीनी! मी अनंता ....

**अंबू :** अय्या! अनंता भावोजी - तुम्ही आत काय करत होता इतका वेळ?

**अनंता :** मी ना? हा आपला .... असाच..

**वशा :** म्हणजे अंघोळ करत होता... म्हणजे मघाशी आला अन् म्हणाला काय उकडतंय - जरा बाथ घेऊन फ्रेश होऊन येतो. म्हटल जा आंत - तो गेला बाथ घ्यायला अन् एवढयात तू आलीस...

**अनंता :** म्हणजे मी आंत गेलो अन् वहिनी आंत आल्या कां! चोरां! मला जबरदस्तीनं आंत घालवलंस आपलं गुपित फुटू नये म्हणून! खरं सांग ?

**वशा :** अंत्या!..

**अंबू :** (अंग घुसळीत) अय्या! कित्ती लबाड आहात हो तुम्ही! मला सुध्दा कळू दिलं नाही. तुमचं आधीच माझ्यावर मन जडलं होतं म्हणून...

**वशा :** (भयानक सुरात) काय?

**अनंता :** वहीनी मांजर डोळे मिटून दूध पीत असलं तरी जग पाहात असतं बरं कां! (वशा डोळे वटारतो)

**अंबू :** (अतिशय आनंदात) मला इतका आनंद झाला आहे म्हणून सांगू! असं वाटतं. नाचत राहावं सारखं! पक्षासारखं हवेत उडावं, गावं, बागडावं हरिणीसारखं (नाचत सुटते)

**वशा :** अगं हळू! खाली माती पडेल. अन् मग नाना कोकलतील! म्हणतील वर माणसं राहतात की माकडं!

**अंबू :** नाना! अय्या.... बरी आठवण केलीत..

**वशा :** हो! भाडं द्यायचं राहिलं नाही कां तुझं. थांब! भाडं देतो.

**अंबू :** चला! चाहटळ कुठले! आता भाडं कसचं देता? आपल्या माणसाकडून कुणी भाडं घेत असतं का ?.... नानांना आपलं गुपित केव्हा सांगीन असं झालं आहे मला ....

**वशा :** अगं मला मघाशीं दिलेलं वचन -- गुपित फोडायचं नाही हं . .

**अंबू :** अनंत भावोजींनं फोडलं ना आपलं गुपित .... आता कसलं गुपित नि कसलं काय ..... नाना अहो नाना .....

**वशा :** अंबे! अग काय हे? वेडी की काय तूं ? .....

**अंबू :** हो! आहोच आम्ही वेडे - (तिरकी मान) एका माणसाचे --

(गिरकी घेऊन नाना अहो नाना अशी म्हणत जाते अनंता बाहेरच्या दारापर्यंत तिच्या मागोमाग जातो अन् ती निघून गेली ही खात्री करुन घेतल्यावर त्या दिशेकडे दोन्ही हातांनी आरती ओवाळीत, "उदो बोला उदो अंबाबाई माऊल'चा हो" असं भसाड्या आवाजांत म्हणत मागे मागे येतो. वसंताच्या अंगाचा इकडे तिळपापड झाला आहे. अनंता स्टेजच्या जवळ जवळ मध्ये आलावर वसंता ती पाठमोरा असतांनाच त्याची मानगूट पकडतो अन् खाऊं की गिळू या नजरेनं पहात म्हणतो ---)

**वशा :** (आवाजात चीड) अनंत्या अंत नको पाहूं!

**अनंता :** (घुसमटल्या स्वरांत) अरे -- पण मी काय केलं? आपण लफडं करायचं ---

**वशा :** (त्याला तसाच झटका देऊन कॉटवर आदळत) लफडं! मी केलं? -- अंत्या शुद्धीवर आहेस का?

**अंत्या :** हाच प्रश्न मी तुला विचारु शकतो (मान चोळत) इकडे अकल्पितेवर प्रेम--तिकडे अंबूवर लाईन --- तुला काय माधव काझीचा आदर्श ठेवायचा आहे का?

**वशा :** अंत्या! लेका! अंबूवर लाईन मारायला मी काय आंधळा आहे का?

**अनंता** : अन् मघाशीं किचन मधून मी जे कांही पाहिलं ते स्वप्नांत प्राहिलं का?

**वशा** : अंत्या! आता तुला कसं सांगू? ....

**अनंता** : कांही सारवासारव करण्याची गरज नाही. मला कळलयं.

**वशा** : काय कळलं? जरा उजेड पाडाल काय?

**अनंता** : अकल्पिता हाती लागत नाही तेव्हा आता घरमालकाची एकुलती एक पोरगी गटवायची अन् पोरीबरोबर सासऱ्याची इस्टेट पण बळकावयाची. आयडिया कांही वाईट नाही. अन् अंबूही तशी अगदीच कांही ही नाही. जरा सावळी आहे पण तब्येत वगैरे ठणठणीत -- आणि खरं म्हणजे "अगर लैला को देखना है तो मजनुकी आँखो से देखो"

**वशा** : अरे ए मजनुकेबच्चे तुझं तर्कट साफ चुकलं.

**अनंता** : साफ चुकलं?

**वशा** : बोंबला!

**अनंता** : अंबू तुला प्रियकरा म्हणून मिठी मारायला धावली तो काय वेडाचा झटका -- ?

**वशा** : तो ताईताचा फटका ...

**अनंता** : ताईत? मंतरलेला?(खो खो हसू लागतो. अगदी पोट दुखायला लागलं असं आवळू न धरत.-आणि कॉटवर गडबडा लोळत - वसंता, शांतपणे त्याच्याकडे पाहात राहतो - कांही वेळानं हसणे ओसरते. पोट दाबुन कण्हल्या सारखं करतो अन् म्हणतो -) बापरे! इतका जीव घेऊ जोक तू करशील असं वाटलं नव्हतं. आः! आज एक जोकबळी होणार होता.

**वशा** : झालं हसून? आता नीट ऐक. ती अंबू चुकीनं त्या खुर्चीवर बसली! ताईताचा स्पर्श तिला झाला. समोर मी होतो! माझी तिला मोहीनी पडली अन्----

**अंत्या** : प्रेमानंद महाराज की जय! वशा लेका खुळा आहेस तू..

**वशा** : खुळा .?

**अंत्या** : नाहीतर काय! अरे तुला जाळयात पकडण्याचा नानांचा व अंबूचा डाव तुझ्या लक्षात कसा येत नाही?

**वशा :** मी नाही समजलो.

**अनंता :** तेच तर सांगतो मी! अंबूचं रुप तिचं लग्न जमण्याच्या आड येतंय! म्हणून तुला दोन खोल्यांचा ब्लॉक भाडयानं देतानांच नानांनी दूर दृष्टिनं असा प्लॅन रचून ठेवला असावा. चांगली कायम नौकरी असलेला जावई कोण सोडील. ?

**वशा :** अंत्या! आता हसायची पाळी माझी आहे..

**अंत्या :** अजून पटत नाही तुला .. ?

**वशा :** कसं पटेल? अंबूसारखी बावळट मुलगी एवढं धाडस करील असं मला स्वप्नात देखील खरं वाटू शकत नाही.

**अंत्या :** मघाशी चालवलेलं तुझं ते ताईत पुराण तिने दारा आडून ऐकलं नसेल कशावरुन? बस्स! त्याचाच तिनं फायदा घेतला! मीर्व्हलस ॲक्टींग! हॅटस ऑफ टु युवर ॲक्टिंग मादाम अंबू! (अंबू गेली त्या दिशेने हॅटस ऑफ ची वाकून ॲक्शन करतो तेव्हा त्याच्या ढुंगणावर एक चापटमारुन)...

**वशा :** तू करीत बैस कौतूक तिच्या ॲक्टींगचं! आता अकल्पिता येईल. तिच्या येण्याच्या अगोदर मी जरा बाथ घेऊन फ्रेश होऊन येतो. हयः। अगदी मरगळून गेलो बुवा -

**अंत्या :** प्लीज एक खुलासा!

**वशा :** आता काय?

**अनंता :** म्हणजे अकल्पिता तुझ्या खोलीवर नक्की येणार काय?

**वशा :** तसं वचन दिलयं तिनं मला.

**अंत्या :** पण कशाकरता खोलीवर तिला बोलावलंय?

**वशाः** थाप मारली तिला. आज माझा वाढदिवस आहे म्हणून - सेलिब्रेशन !

**अंत्या :** अच्छा! मघाशी किचन मध्ये मिठाई आणून ठेवलेली दिसली होती ती यासाठी तर ..

**वशा :** (साशंक) होती म्हणजे ती आता .. ?

**अंत्या :** माझ्या पोटात आहे..

**वशा :** चांगला वार केला माझ्या पाठीवर (पटकन बसतो)

**अंत्या :** डरो मत! मला काय माहित तुझं लफडं, आत्ता आणतो दुसरी मिठाई! खालच्या हलवाया कडून -- पांच मिनिटांत, विदीन फाईव्ह मिनीटस् ....

**वशा :** जा पळ. (अंत्या घाईनं निघून जातो. त्याला एकदा कोपरापासून नमस्कार करुन दोरीला टांगलेला टावेल हातात घेऊन वशा किचनच्या दाराने बाथ घ्यायला जातो. थोडयाच वेळांत शॉवरचा आवाज व वशाचं गुणगुणणं - ती पाहताच बाला कलिजा खलाश झाला .... एवढ्यात अकल्पिता प्रवेश करते. दिसायला सुंदर, मॉडर्न पोशाख, चालणं, बोलणं, वागणं - हातात प्रेझेंट)

**अकल्पिता** : वसंता! ए वसंता! ....

(ती पाहताच बाला रंगात आलं आहे.. हाक ऐकू जात नाही) बाथ घेतोय वाटतं. (टेबलकडे येते. त्यावर प्रेझेंट ठेवते अन् पाण्याचा जग हातात घेऊन पाणी पिण्यासाठी खुर्चीवर बसते. एकदम ताठ उभी राहते. डोळे तारवटल्यासारखे हातात पाण्याचा जग तसाच. घुमल्यासारखे संगीत.. अनंता प्रवेश करतो. हातात मिठाईचा पुडा - अकल्पिता उभी आहे.)

**अनंता :** हॅलो! कोण अकल्पिता, केव्हा आलीस? वशा आत स्नान करतोय वाटतं.

**अकल्पिता:** (क्षण दोन क्षण अनंताकडे पाहते अन मग एकदम त्याच्याजवळ जात त्याच्या गळ्यात हात घालत) ओ डिअर किती उशीर केलास? .. कुठं गेला होतास रे तूं?

**अनंता :** (अनवधानाने) मिठाई आणायला! अगं! पण मी वसंता नाही. मी अनंता (गळ्यातला तिचा हात काढत) वसंता आंत बाथ घेतोय. तो पाहा आवाज.

**अकल्पिता** : मला त्याच्याशी काय करायचं? मला तूच हवाय. आय लव्ह यू डिअर अनंटा.. डिअरेस्ट..( आवेगानं पुन्हा गळयांत हात घालायला जाते... अनंता अरुणा अशी साद घालून धाडकन बेशुध्द पडतो)

**अकल्पिता** :ओ डिअर! काय झालंय रे तुला (हातातल्या जगमधील पाणी त्याच्या तोंडावर मारु लागते तेव्हढ्यात वसंता.

"कलिजा खलास झाला" असं गुणगुणत आत येतो.)

**वसंता** : (बेशुध्द पडलेल्या अनंताकडे पाहात) खलाश! (अकल्पितेला) झाला?

**अकल्पिता** : शुध्द गेलीय त्याची!

**वसंता** : शुध्द गेली? कशी?

**अकल्पिता** : आताच बाहेरुन आला. माझ्याकडे पाहिलं अन् लगेच अरुणा असा टाहो फोडून एकदम बेशुध्दच झाला -- तोंडावर इतकं पाणी मारलं पण शुध्दीवर येत नाही ..

**वसंता** : पण हा असा एका एकी ...

**अकल्पिता** : आता विचार करत बसू नको. लवकर डॉक्टरला घेऊन ये (वशा जाऊ लागतो). थांबरे याला कॉटवर झोपवू प्रथम (दोघं मिळून त्याला कॉटवर ठेवतात).

**वसंता** : (घुटमळत) डॉक्टरला बोलावू म्हणते? की येईल आपोआप शुध्दीवर? नाही! म्हणजे आमचा डॉ. बहिरट....

**अकल्पिता** : बहिरट आण नाही तर वेडपट आण ... पण डॉक्टरला आण लवकर ..(वसंता जायला निघतो. वाटेत अनंतानं आणलेला मिठाईचा पुडा दिसतो. तो उचलून टेबलावर ठेवून अंदाज केल्यासारख्या सुरात)

**वशा** : मिठाई! येस! करेक्ट! मघाशी हयानं मिठाईच खाल्ली होती. चांगली कीलोभर असेल. पार खतम करुन टाकली हयानं. त्या मिठाईत तर ..

**अकल्पिता** : ओः माय गॉड! फूड पायझनींग म्हणतो! धाव रे धाव! वसंता! डॉक्टरांना घेऊन ये. लवकर. आता मी काय करुं. ?

**वशा** : घाबरु नको ग! आत्ता घेऊन येतो डॉक्टरांना. ॲण्ड डोंट वरी. आमचा डॉ. भुजंगराव बहिराट फार हुषार आहे. हजारोंची प्रॅक्टिस आहे त्याची -

**अकल्पिता** : वसंता आता जातोस की ...

**वशा** : बस्स! सुटलो (जातो)

(**अकल्पिता** अनंताच्या कडेला बसून त्याला थापटया मारुन बघते अनंता! अनंता अशी साद घालते. तो उठत नाही असं पाहून एकदम स्ट्राईक झाल्यासारखं कांदा, कांदा म्हणत स्वयंपाक घरात जाते - ती गेली का हे

पाहण्यासाठी अनंता डोळे प्रथम किलकिले करतो. मग खात्री झाल्यावर ताडकन् उठून कॉटवर बसतो. मग एकदम उर्मी आल्यासारखा बाहेरच्या दाराकडे हळुहळू जाऊ लागतो. अकल्पितेचा अंदाज घेतो. दारापाशी घुटमळतो. मग कांही एक निश्चय करुन परत फिरतो. कॉटवर चुपचाप पडून राहतो. अकल्पिता येते. बडबडू लागते.)

**अकल्पिता** : काय किचन म्हणायचं की काय, एक कांदा सुध्दा मिळत नाहीं. आता काय करावं? वसंता अजून कसा येत नाही? अनंता! डार्लिंग काय झाल रे तुला? डिअर, उघडना डोळे आपल्या लाडक्या अकल्पितेकडे पहाना एकदा ...( त्याच्या चेहऱ्यावर वाकून पाहू लागते. एकदम स्ट्राईक झाल्यासारखं पदराचं सूत घेऊन नाकात घालते. मोठ्यानं शिंक देऊन अनंता उठून बसतो. अकल्पिता हर्षानं त्याचा हात हातात घेते ...) डिअर! अनंता! शुध्दीवर आलास का तू नीट.. माझ्याकडे पाहा. मी तुझी लाडकी अकल्पिता....

**अनंता** : (हात झटकून) आं! आं!

**अकल्पिता** : अनंता! काय होतंय तुला? असा कां करतो? पोट दुखतंय कां?

**अनंता** : आ... आ..

**अकल्पिता** : मग खावी कशाला इतकी मिठाई पोट दुखू लागे पर्यन्त? इतकं गोड खाणं वाईट असतं - व्हेरी बॅड - डॅड -म्हणतात. एक किलो मिठाई - माय गॉड! खाववली तरी कशी म्हणते मी! अं?

**अनंता** : आ..आ (भरभर हाताची खाल्ली अशी ॲक्शन करतो)

**अकल्पिता** : (एकदम - प्रेमाचं भरतं आल्यासारखी) माझं सोनुलं बाळ ते! इतकं गोड आवडते माझ्या बाळाला (त्याची हनुवटी धरते - तो हात झटकतो).

**अनंता** : (नाही नाही या अर्थानं) आ... आ... आ...

**अकल्पिता** : नाही खाणार आता? शाहाणाच आहे माझा अनंता. डिअर! पोट दुखतं बघ मग आता सारखं... थांब जरा! चोळून देते - (त्याला कॉटवर आडवं करायचा प्रयत्न करते... तो पाय हवेत झाडतो.. आ.. आ... आ.. करतो. पोटावर हात दाबून ठेवतो) - मग शेकून देऊ? नको!

मग काय करुं? सोस हो थोडं. आता डॉक्टर येतील. वसंता गेला आहे. त्यांना आणायला! काय बरं त्याचं नांव? येस! डॉ. बहिरट भुजंगराव...

**अनंता** : (हाताची नागाची फणी करुन तोच हात कपाळाला लावतो)

**अकल्पिता**: इतका काय घाबरतोस डॉक्टरांना एखाद्या लहान मुलासारखा. अन् डिअर आज तुझा वाढदिवस नां? (अनंता डोक्यावर हात मारतो) आम्ही बघ तुझ्यासाठी काय प्रेझेंट आणलं! बघ बघ.. (टेबलावरचं प्रेझेंट उघडायला लागते. अनंताच्या खणाखुणा चालूच. माझ्या नाही.. वसंताचा वाढदिवस या अर्थाच्या) आवडलं? छान आहे नां? सांग ना? बोल?

**अनंता** : (बोलता येत नाही अशा खुणा करतो) आ.. आ.. आ..

**अकल्पिता** :ओ गॉड!-तुला बोलता येत नाही? पण कां? मघाशी तर तू छान बोललास... कोण ती मेली अरुणा की करुणा तिला हाक मारलीस अन्...

(वसंता डॉक्टर बरोबर येत.. अनंताकडे म्हणजेच कॉटकडे पाठ)

**वसंता** : बेशुध्द पडला. नुकतीच त्यांनी एक किलो मिठाई खाल्ली होती तेव्हा आम्हाला संशय आला की फूड पॉयझनिंग वगैरे तर झालं नसावं? म्हणून तुमच्याकडे धावत आलो.

**डॉक्टर** : कुठाय पेशंट?

**वसंता** : कॉटवर ठेवलंयं (कॉटकडे वळतो! अनंता बसलेला पाहून) आ!! तूं. आलास शुध्दीवर .. बरं झालं! काय घाबरवलं होतंस. डॉक्टर आलाय तो शुध्दीवर ... तुम्हाला उगीच तसदी ....

**अकल्पिता** नो नो डॉक्टर जाऊ नका. त्याला तपासा! शुध्दीवर आलाय तो पण त्याला बोलता येत नाही हो. मुका झालाय तो! कसला तरी शॉक - - -

**वसंता** : शॉक? कसला?

**अकल्पिता** : मला तरी काय माहीत! पण एवढं खरं की माझा अनंता मुका झालाय हो! (गळा काढून रडू लागते)

**वसंता** : माझा अनंता? (अनंता कडे रागानं पाहतो. अनंता खाणाखुणा करतो माझा कांही दोष नाही या अर्थाच्या).

**डॉक्टर** : घाबरु नका अकल्पिता बाई. सगळं ठीक होईल! मी तपासतो त्यांना! शोक आवरा. (डॉक्टर अनंताला तपासू लागतात. जीभ पाहतात. ऑ करायला लावून अनंताला तपासू लागतात. घशात डोकावतात. कसली तरी पट्टी तोंडात घालून टॉर्चनं तोंडात उजेड मारुन पाहतात - नंतर गोंधळलेल्याआवाजात).

**डॉक्टर** : एव्हरीथिंग इज ओ.के. काय बिघाड झालाय काय कळत नाही. तरी पण एक इंजेक्शन देऊन टाकतो. (बॅग मधून इंजेक्शनची पिचकारी काढून इंजेक्शन देण्याची तयारी करु लागतो. अनंता कॉटवरुन उठून बाहेरच्या दाराकडे पळण्याचा प्रयत्न करतो. वसंता त्याला पकडून ठेवतो. डॉक्टर इंजेक्शन देण्यासाठी जवळ जातात. तसा वसंताच्या हाताला हिसडा मारुन अनंता पळू लागतो. पाठोपाठ डॉक्टर व वसंता. अनंताला शेवटी वसंता पकडतो. डॉक्टर इंजेक्शन देतो. अनंता गुरासारखं ओरडतो अन् कॉटवर अंग झोकतो. डॉक्टर धापा टाकीत खिडकी जवळच्या खुर्चीवर बसतो.)

**डॉक्टर** : (धापा टाकत) बापरे असा पेशंट पाहिला नाही. साध्या इंजेक्शनला घाबरतो! दमवून टाकलं.

**अकल्पिता** :(रडक्या सुरात) पण, त्याला बोलता येईल काहो ?...

**डॉक्टर** : घशाच्या स्पेशालिस्टाला दाखवावं लागेल. ताबडतोब. केस सीरीयस वाटते. डोक्यावर सुध्दा परिणाम झालाय! वेडाचे झटके... (अनंता तुझंच डोकं फिरलयं अशा खुणा करतो तोंडाने आ..आ..)

**डॉक्टर** : बरं पण माझी फी ...( अनंता डॉक्टरच्या अंगावर धावून जातो ... डॉक्टर भयभीत होऊन पळतात)

**अकल्पिता** : वसंता! मी आता काय करु?

**वसंता** : मी तरी काय सांगू? माझं तर डोकंच काम करेनासं झालं आहे. आतापर्यन्त हा चांगला होता अन. एकाएकी-सगळं फसत चालतंय...(एकदम संशय येऊन) अकल्पिता! एक सांग! हयाचं नि तुझं प्रेमप्रकरण केव्हापासून चालू आहे ?...

**अकल्पिता** :(भारावलेल्या सुरात) जन्मजन्मांतरापासून!

**वसंता** : आणि तुम्ही मला सुगावा सुध्दा लागू दिला नाही. तुझं एक

ठीक. पण हा अनंत्या माझा मित्र म्हणवतो. अन् माझा असा केसानं गळा कापायास निघाला. अंत्या? अंत्या! मला माधव काजी म्हणायला निघालास अन् तू स्वतः (त्याची मानगूट धरतो. अकल्पितेला हे सहन होत नाही. अनंताला आपल्याजवळ हात धरुन ओढत ---)

**अकल्पिता** : खबरदार! त्याच्या अंगाला हात लावशील तर! मी कोण आहे माहीत आहे ना तुला. चल अनंता! डिअर आपण माझ्या घरी जाऊ. मी सारं कांही सांगते डॅडना. चांगल्या एक्सपर्टला दाखवून तुझ्यावर इलाज करते! तुला बोलता केल्याशिवाय मी चूप बसणार नाही. कितीही पैसा लागला तरी! (त्याचा हात धरुन त्याला ओढत घेऊन जाते. अनंता आँ आँ करत जातो. वशा तिकडे काहीवेळ पहात राहतो. नंतर कॉटवर बसतो. गळून गेल्यासारखा. ताईताकडे पाहतो. मग बडूबडू लागतो).

**वसंता** : झालं! लागला निकाल आमच्या प्रेमाचा! मोठ्या आशेनं एवढा डाव रचला अन् गळयात पडली कोण?... .. खालची म्हैस ... अन् अंत्यानं गटवली सुवर्णलतिका ... सालं आमचं नशिबच गांडू.. त्याला ताईत काय करणार ... अंत्याला भेटायला अकल्पिता आपल्या खोलीवर आली अन् म्हणून लेकाच्याचं प्रकरण तरी उघडकीस आलं. अकल्पितेनं भावनेच्या भरात माझा अनंता म्हणून साद घातली. अन् माझे डोळे खाडकन् उघडले ... तरीच लेकाचा माझा प्लॅन मी त्याला मघाशी सांगत होतो तेव्हा खिदळत होता. .. ठिक आहे. बच्चमजी! मी पण पाहून घेईन. .. पण एक समजत नाही हा मुका कसा काय झाला?... की साल्यानं सोंग आणलंय? जरा पाळत ठेवली पाहिजे. (एवढयांत नाना आणि नानी प्रवेश करतात. नाना टेबलाजवळच्या खुर्चीवर धापा टाकत बसतात. नानी कमरेवर हात ठेवून नानांना खाणाखुणा करतात)

**नाना** : अग हो हो विचारतो. जरा दम घेऊ देशील की नाही?.

**नानी** : दम घेताय! जीव जायची वेळ आली माझी!

**नाना** : आजवर अनेक वेळा आलीय ती ...

**नानी** : पण नाही गेला म्हणाना - त्याचीचं वाट पाहताय तुम्ही. मला माहित आहे. पण मी कांही तशी सुखासुखी मरणार नाही.

**नाना :** (पुटपुटात) तेवढं कुठचं आमचं भाग्य?

**नानी :** काय?

**नाना :** नाही! मी म्हणतो ते जाऊ दे! तुला वसंतरावांना काय विचारायचं आहे ते विचार ना!

**नानी :** काय हो? केव्हापासून चालले आहेत तुमचे हे चाळे?

**वसंता :** चाळे?

**नानी :** उगीच वेड घेऊन पेडगावाला जाऊ नका! चांगलं ओळखलं आहे मी तुम्हाला!

**वसंता :** पण नानी! मला कळलं नाही! खरंच काय म्हणता तुम्ही?

**नानी :** अहो! सांगा त्यांना मी काय म्हणते ते!

**नाना :** नाही! म्हणजे नानीचं म्हणणं असं की साधारणतः केव्हापासून तुम्ही आमच्या अंबूवर प्रेम करु लागला! अगदी आज अंबूनं सांगेपर्यन्त आम्हाला पत्ता लागू दिला नाही -- कमाल आहे बुवा तुम्हा तरूण लोकांची - -

**नानी :** कौतुक कसलं करता हो डोंबलाचं? खडसाऊन विचारा, का माझ्या भोळ्या भाबड्या मुलीला फूस लावली म्हणून? जाब द्या म्हणा -

**नाना :** हॉं! द्या जाब!

**वसंता :** अहो जाब कसला देऊ? मला तरी आजपर्यन्त कुठं ठाऊक होतं?

**नानी :** ठाऊक नव्हतं? मग आज काय तुला साक्षात्कार झाला कारे बाबा..

**वसंता :** अहो अंबू आज एकदम निकरावरच आली..

**नाना :** नाही येणार! कां नाही येणार? किती दिवस बिचारी झुलत राहील नुसत्या आशेवर? म्हणून शेवटी तिनं सोक्षमोक्ष लावून टाकला असेल. बरं झालं तुम्ही कबूल केलं ते. दान आपल्या बाजूनं पडलं म्हणून खूप आनंद झालाय तिला..

**नानी :** का नाही होणार? तुमचीच मुलगी ती. भोळसट! तिला समजणार आहे का याचा डांव!

**वसंता :** डाव? ..

**नानी :** हो, हो, डाव. मेल्या आमच्या इस्टेटीवर नजर् आहे तुझी.

एकुलती एक पोर पाहून -

**नाना :** अग! अग काय म्हणतेस तूं ?..

**नानी :** तुम्ही गप्प बसा हो! तुम्हाला झाली असेल आपली मुलगी भार! मला नाही. मी नाही देणार माझी मुलगी ह्याच्यासारख्या फाटक्या कारकुनाला - पाहताय कां शुंभासारखे .. सांगा त्याला...

**वसंत :** (स्वगत) अरे वा. सुंठे वाचून खोकला गेला (उघड), नानी, नानी, मला तुमच्या इस्टेटीचा लोभ नाही. पण तुमच्या मनाविरुध्दहि मी जाऊ शकत नाही... खरंच माझ्या बरोबर अंबू सुखी होऊ शकत नाही हे पटलंय मला - (कृत्रिम) अंबू! मला क्षमा कर! जिथं जाशील तिथं सुखी राहा.

**नानी :** बघा! आणलं नं सरळ ह्याला! हिसका दाखवल्यावर...

**नाना :** (ताडकन् उठून) थांब! आता तुलाच हिसका दाखवतो! इतके दिवस चूप राहिलो. म्हटलं एकानं पडतं घेतलं संसारांत तर वादावादी टळते. संसाराच गाडं सुरळीत चालतं. पण आता पोरीच्या आयुष्याचं वाटोळं होऊ घातल्यावर मी चूप राहू शकत नाही!

**नानी :** तुम्ही चूप बसा हो!

**नाना :** खामोष! आता हा वाघ जागा झाला आहे. अंबूचं लग्न वसंतरावाशी लावून देईन तेव्हाच .. ... ..

**वसंता :** नाना! जाऊ द्या! उगीच डोकंतापविण्यात अर्थ नाही. ब्लड्प्रेशर वाढेल. अंबूला माझ्यापेक्षाहि उत्तम स्थळ मिळेल.. आपल्या तोलामोलाचं. माझी अंबू सुखी होण्यातच माझं सूख आहे नाना ..

**नाना :** पोरा! तुझं मन मारुन तू बोलत आहेस हे कळत नाही का मला..

**वसंता :** नाना! त्यागातच खरं प्रेम असतं ... ... ...

**नाना :** अरे पण कां? आमच्या कुटूंबाच्या हट्टापायी! मुळीच नाही! तू लग्नाला तयार. तिकडे अंबूही तयार - अरे मिय्या बिबि राजी तो क्या करेंगा ये काजी ...

**नानी :** मी काजी?

**नाना :** हॉं जी ..

**नानी :** अस्सं का? थांबा! तुम्हालाच दाखवते माझा हिसका.. त्याशिवाय वठणीवर येणार नाही तुम्ही दोघं (नानाच्या अंगावर धावून

जाणार इतक्यात नानाच चपळाईनं तिला धरतात अन् दाबून टेबलजवळील खूर्चीत बसवतात. ताईताचा स्पर्श नानींना! घुमणारं संगीत. नानी काही वेळ ताठ बसते. नाना समोर उभे असतात. त्यांच्याकडे पाहते. नंतर..

**नानी :** (लाजून) हे काय गडे! चार चौघांसमोर अंगचटीला जाणं! सोडा! सोडा मला! नाथ!

**नाना :** ऑ! हे काय! नानी... नानी.. काय झालं तुला?

**नानी :** मला काय होणार.. नाथ? पण गडे मला आपली म्हणाल ना? म्हणाना आपली..

**नाना :** बापरे! हिला हा कसला झटका आला? संतापनं हिच्या डोक्यावर परिणाम तर झाला नाही ना! नानी! नानी शुध्दीवर आहेस कां?

**नानी :** मला आता खरी शुध्द आली हो! खरंच किती छळलं हो मी तुम्हाला! आतापर्यन्त! एखाद्या वैरिणीसारखं! आता नाही हो मी अशी वागणार! खूप खूप सुखात ठेवणार आहे मी तुम्हाला - जिवलगा ...

**नाना :** अरे देवा!

**नानी :** आता मी तुमच्या अध्र्या वचनांत राहीन! तुम्ही म्हणाल ते मला कबूल.

**नाना :** कबूल (एक कल्पना चमकते) खरं सांग. नाहीतर पलटशील.

**नानी :** नाही पलटणार..

**नाना :** पहा बरं..

**नानी :** परीक्षा घेवून पहा..

**नाना :** मी आपल्या अंबूचं या वसंतरावाशी लग्न लावून देणार आहे.

**नानी :** अगबाई! हो! किती आनंदाची गोष्ट (वसंता ठार मेलो म्हणत कॉटवर बसतो).

**नाना :** कॉग्रॅच्युलेशन जावई बापू! सासूबाई मानल्या! चमत्कारच झाला. तुमच्यासाठी (त्याचा हात हातात घेऊन हालवतात. वसंताचा हात जीव गेल्यासारखा हालतो)

**नानी :** (टेबलावरचा मिठाईचा पुडा उचलून नानांना देत) या मिठाईनं तोंड गोड करा जावईबापूचं! (कौतुकानं वसंताकडे पाहू लागतात)

**नाना :** घ्या! मिठाई घ्या! (वसंताचा हात पुढे घेऊन त्यावर मिठाई ठेवतात) घ्या तोंड गोड करा.

(वसंता ती खाऊन कडू तोंडानं बसला आहे. इतक्यात दारात एक व्यक्ती उभी राहते. सूट बूट टाय आणि डोळ्यावर चष्मा असा वेश. हातात कातडी बॅग)...

**सालिसीटर :**(बोलणं एकदम वरच्या पट्टीत आणि भावनारहित) वसंतराव जडबुध्दे इथंच राहतात कां?

**नाना :** हो! हेच वसंतराव जडबुध्दे!

**सालिसीटर :** (आत येत) तुम्हीच वसंतराव जडबुध्दे?

**नाना :** म्हणजे मी खोटं सांगतोय?

**सालिसीटर :**नाही म्हणजे खात्री करुन घेतली. म्हणजे आमचा पेशाच तसा ना?

**नाना :** कोण आपण?

**सालिसीटर :**मी सालिसीटर लोचट.

**नाना :** लोचट?

**सालिसीटर :**पुरुषोत्तम रामचंद्र लोचट.

**नाना :** म्हणजे पु. रा. लोचट.

**सालिसीटर :**बरोबर!

**नाना :** वसंतरावांशी कोणतं काम-----कांही क्रिमि, वगैरे

**सालिसीटर :** मी या खुर्चीवर बसू कां?

**नाना :** बसा ना? (खिडकी जवळची खुर्ची समोर ओढून तीवर बसतो)

**सालिसीटर :**जरा पाणी मिळेल का प्यायला?

**नानी :** हो! (किचन मध्ये जाऊन पाणी घेऊन येतात)

**सालिसीटर :**(पाणी पितो नंतर घसा खाकरुन वसंताला) आपले कुणी काका आहेत कां?

**वसंता :** काका! (आठवण करुन) हां! वडीलम्हणायचे कधी कधी! त्यांचा एक लहान भाऊ पळून गेला म्हणून - लहानपणी!

**सालिसीटर :** कृपा करुन त्यांचं पूर्ण नांव आठवू शकाल काय?

**वसंता :** त्यांचं नांव जनार्दन! म्हणजे पूर्ण नांव झालं जनार्दन राघव जडबुध्दे! पण कां?

**सालिसीटर** : म्हणजे ज.रा.जडबुध्दे! तुमचे काका! लहानपणी पळून गेले. म्हणजे त्यांच्या की तुमच्या?

**वसंता** : अहो माझ्या लहानपणी - त्यांच्या नाही. माझ्या वडीलांशी पटलं नाही म्हणून.

**सालिसीटर** :कां पटलं नाही?

**वसंता** : आता मला काय ठाऊक? पटलं नाही. निघून गेले. त्यांचा ठावठिकाणाही कोणाला माहित नाही. आमच्या वडिलांनीही शोध घेतला नाही!

**सालिसीटर** : ते आफ्रिकेत पळून गेले!

**वसंता** : ऑ! तुम्हाला कसं माहीत?

**सालिसीटर** :मला अजून बरंच माहित आहे (नानीला) जरा चहा आणता कां?

**नाना** : नानी, जरा चहा करुन आण (नानी किचनमध्ये जाते)

**सालिसीटर** :ह्या तुमच्या ....

**नाना** : आमचं कुटुंब - पण काहो लोचट तुम्ही मघापासून ह्या काय चांभार चौकशा चालवल्या आहेत?

**सालिसीटर** :आमचा पेशाच तसा ना! --- तर यांचे काका श्री. ज. रा. जडबुद्धे –

**नाना** : हं! त्यांचं काय आता --- इतक्या दिवसांनी?

**सालिसीटर** :देहावसान झालं.

**नाना** : ऑ! काय म्हणता?

**वसंता** : काका गेले! अरेरे! कधी पाहिलं सुध्दा नाही मी त्यांना!

**सालिसीटर** :पण त्यांना तुमची आठवण शेवटपर्यंत होती ना!

**वसंता** : तुम्हाला कसं माहित?

**सालिसीटर** :त्यांच्या मृत्यूपत्रांत त्यांनी आपली सारी इस्टेट आपल्या एकुलत्या एक पुतण्यास–म्हणजे तुम्हाला म्हणजे वसंत राजाराम जडबुध्दे यांना दिली आहे. पण एका अटीवर.

**नाना** : कोणत्या?

**सालिसीटर** :माझ्या पुतण्यानं लग्न केलं असेल तर किंवा नसेल तर मी

मेल्यावर सहा महिन्याच्या आंत लग्न केलं तर माझी सर्व इस्टेट त्याला मिळावी. नपेक्षा ---

**नाना :** नपेक्षा ?

**सालिसीटर** :नपेक्षा सहा महिन्यानंतर माझ्या इस्टेटीची संपूर्ण वारस माझ्या जिवश्च कंठश्च मित्राची मुलगी कु. यमुना जोशी होईल. आणि नंतर माझ्या पुतण्याचा त्यावर काडीचाहि हक्क रहिणार नाही.

**नाना :** विचीत्रच अट म्हणायची! --- म्हणजे हयांनी लग्न कुणाशीं करावं असं काकांचं म्हणणं होतं?

**सालिसीटर** :लग्न कुणाशीही करावं - पण सहा महिन्याच्या आंत --- मग सांगा वसंतराव तुमचं लग्न झालेलं आहे? ,

**नाना :** नाही. पण सहा महिन्यानं कशाला एवढयात होणारच आहे. आमच्या अंबूशींच.

**सालिसीटर** :कॉंग्रॅच्युलेशन! वसंतराव (नानी चहा आणून ठेवते सालिसीटर चहा पिऊ लागतो)

**नाना :** पण पुतण्याचा लग्नाचा एवढा आग्रह कां? तुमचे काका जरा अर्धवट होते का हो?

**वसंता :** मी लहान होतो नाना. मला कल्पना नाही. त्यांचा चेहरा सुध्दा मला नीट आठवत नाही.

**सालिसीटर** :मी सांगतो. हयांच्या काकांनी लग्न केले नाही. आयुष्यभर अविवाहित राहिले. आयुष्याच्या शेवटीं त्यांना मायेचं कुणी नव्हतं. इतका पैसा पण सुख मिळालं नाही. प्रेम मिळालं नाही. त्यांनी मृत्युपत्रांत तसं लिहून ठेवलंय. नुसत्या पैशामुळे –

**नाना :** काय हो! असा किती पैसा साठवला होता म्हाताऱ्यानं?

**सालिसीटर** : दहा लाख!

**नाना :** दहा लाख! बापरे! वसंतराव तुम्ही लक्षाधीश झालांत! माझा जावई लक्षाधीश झाला -- माझा जावई लक्षाधीश झाला--- अंबू अग तुझ्या नवऱ्यानं नशीब काढलं!

(जोरजोरात हसू लागतात. हर्ष वायु झाल्यासारखं हसत राहतात. सालिसीटर नुसता बघत राहतो! निर्वीकार! नानी व वसंता त्यांना आवरण्यासाठी धावपळ करु लागतात. इतक्यात –– पडदा)

## अंक दुसरा

**स्थळ** :- तेच - (वेळ सकाळची. कॉटवर वसंता अस्ताव्यस्त पसरलेला आहे. नाईट पायजमा, शर्ट. दार ठोठावण्याचा आवाज - दूध म्हणून हाक)

**वसंता** : (उठतो, आळस देतो) काय कटकट आहे! भरपूर झोप सुध्दा होऊ देत नाही हा भय्या. या भय्यांना सारे वार सारखेच. आज रविवारी सुध्दा हे पहाटेच्या वेळी आपल्या साखर झोपेत व्यत्यय आणणार! (आळसटलेल्या चालीनंच किचनमध्ये जातो अन् भांडं घेऊन बाहेरच्या दाराबाहेर जातो. एक मोठ्या जांभईचा आवाज. मागून वसंताचं गुरकावणं ऐकू येतं) कारे भय्या इतवारके दिन भी तुम्हारी नींद रोज के टाईम पे खुलती है क्या? दरवाजे पे आकेकटकट करता है?

**भय्या** : माफ करना बाबूजी!

**वसंता** : म्हणे माफ करना! हं (असं म्हणत दूध घेऊन आत किचनमध्ये जातो. मग बाहेर येतो. खिडकीतून आत चांगलं उजाडलं आहे हे दिसून येतं तरी कॉटकडे जातो अन् अंग झोकून देतो. इतक्यात पुन्हा दारावर टकटक)

**वसंता** : (ताडकन उठतो) आता कोण? अनंता आला वाटते. पण तो अशी टिकटिक करणार नाही. दरवाजाच बडवतं! लेकाचा ---- (दरवाज्याकडे जातो, उघडतो, दारात अंबू)

**वसंता** : कोण? अंबू! इतक्या सकाळी!

**अंबू** : सकाळी? दिवस पाहा किती वर आलाय तो.

**वसंता** : अगं, आज रविवार ना? म्हणून ---

**अंबू** : इश्य, म्हणून इतक्या वेळ झोपायचं?

**वसंता** : (जांभई देता देताच बोलतो) आज रविवार! त्यांत काल जाग्रण झालं! नानांना अटॅक आला रात्री! धावपळ झाली --- कसे आहेत नाना?

**अंबू** : चांगली आहे आता तब्येत. त्यांनीच तर पाठवलं मला वर. म्हणाले दूध आलं आहे तेव्हा चहा करुन दे वसंतरावांना गरमागरम.

**वसंता** : मी करुन घेईन आपल्या हातानं. तू कशाला त्रास घेतेस?

**अंबू** : इश्य! आपल्या माणसाचा त्रास होतो का कधी? (किचन मध्ये जाऊ लागते)

**वसंता** : (तिला आडवा होत) अंबू पाऊल मागे घे.

**अंबू** : इश्य!इतकंका रागावयाचं आपल्या माणसावर ?

**वसंता** : आपले अजून लग्न झालेलं नाही.

**अंबू** : पण होणार आहे ना?

**वसंता** : भविष्याच्या पोटांत काय काय दडलं आहे कुणास माहित पण–

**अंबू** : मला कळत नाही तुम्ही काय म्हणता ते.

**वसंता** : नाही कळत ना! मग माझं ऐक!

**अंबू** : नाना म्हणाले म्हणून वर आले.

**वसंता** : आता मी म्हणतो म्हणून खाली जा.

**अंबू** : जाऊ?

**वसंता** : जा!

**अंबू** : रागावला नाही ना?

**वसंता** : (रागानं ) नाही - ( अंबू घाबरुन जाते)झालं! सकाळीं सकाळीच त्या भय्याचं तोंड अन् आता हिचं तोंड पाहिलं! आता सगळा दिवस खराब जाणार! करायला गेलो काय अन् झालं काय! अकल्पितेसाठी जाळं टाकलं, त्यात ही घोरपड अडकली (ताईता कडे लक्ष जातं) ह्या ताईतानंच सगळा घोटाळा केला. हाच फेकून देतो म्हणजे कटकट चुकली. (जोरात खुर्चीकडे जातो. ताईत सोडतो. हातात घेतो. इतक्यात पुन्हा विचार पालटतो) पण ताईत फेकून तरी काय होणार? त्यानं जो घोटाळा करुन ठेवलाय तो काय ताईत फेकल्यानं दुरुस्त होणार आहे? कांहीतरी वेगळाच उपाय योजिला पाहिजे --- आणि सध्या हा ताईत लपवून ठेवला पाहिजे . कुठंतरी. नाही तर आणखी घोटाळा व्हायचा. (टेबलावर ठे ऊन पाहतो. पुन्हा उचलतो. पुस्तकात दडवतो. पुन्हा बाहेर काढतो. कुठं लपवावा याचा निश्चय होत नाही. अरुणा प्रवेश करते. नोकरी करणारी मुलगी जशी असेल तसा पोशाख. बोलणं, चालणं वगैरे वरुन सहज ओळखूं यावी)

**अरुणा** : गुडमॉर्निंग! वसंता!

**वसंता** : गुडमॉर्निंग अरुणा! (झटकन् ताईत कॉटवरच्या ऊशीखाली दडवतो) इतक्या सकाळीं सकाळीं कसं काय येणं केलं?

**अरुणा** : म्हणजे आम्ही तुझ्याकडे कधी येऊं नये वाटतं?

**वसंता** : छे, छे तसा नाही माझ्या बोलण्याचा अर्थ! मला म्हणायचंय ---

**अरुणा** : समजलं! तुला हेच म्हणायचं ना की मी अनंताकडे आले. तुझा कयास बरोबर आहे. कुठाय तो? (टेबला- जवळच्या खुर्चीवर बसते. वसंता कॉटवर बसत)

**वसंता** : इथं नाही.

**अरुणा** : मग कुठाय? त्याची खोली त्याला अचानक खाली करावी लागली म्हणून तो तुझ्याकडे राहणार होता काही दिवस - दुसरी खोली मिळेपर्यंत. असं सांगितलं होतं त्यानं मला काल!

**वसंता** : काल तो इथं आला होता पण राहिला नाही.

**अरुणा** : कुठे गेला?

**वसंता** : अकल्पितेबरोबर! तिच्या घरीं!

**अरुणा** : तिच्या बरोबर! तिच्या घरी! कशाला?

**वसंता** : त्या दोघांचं एकमेकावर प्रेम आहे.

**अरुणा** : वसंता! काय सांगतोस काय? अनंताचं माझ्यावर प्रेम आहे. माहित आहे ना तुला?

**वसंता** : काल पर्यंत मीही याच भ्रमात होतो. पण काल प्रत्यक्ष या डोळयांनी पाहिल्यावर ----

**अरुणा** : (आवाजात किंचित कंप) काय पाहिलं?

**वसंता** : काय सांगू? कसं सांगू? अरुणे! माझ्या अगदी जीवावर येतं ग!

**अरुणा** : वसंता माझी शपथ आहे तुला! जे काय तूं काल पाहिलं ते सांग मला. माझा विश्वास आहे तुझ्यावर!

**वसंता** : पण माझा माझ्या डोळयांवर विश्वास बसत नाहीना! असं वाटतं मी काल एखादं स्वप्न तर पाहिलं नाही ना? भयानक!

**अरुणा** : आता अंत पाहूं नको रे माझा? काय पाहिलं तूं?

**वसंता** : त्या दोघांना एकमेकांच्या मिठीत पाहिलं. ह्या इथं! साधारणतः सात वाजायची गोष्ट. मी बाथरुम मधून बाथ घेऊन बाहेर आलो तो ती दोघं एकमेकांच्या मिठीत! मी आल्याबरोबर अनंतानं बेशुध्द झाल्याचं सोंग वठविलं! मी फसलो. डॉक्टरांना घेऊन आलो. पाहतो तो हा

शुध्दीवर आलेला! मला पाहताच त्यानं मुक्याचं सोंग घेतलं!

**अरुणा** : मुक्याचं सोंग! ते कशाला?

**वसंता** : अग सरळच आहे! माझ्या प्रश्नांची उत्तरं टाळण्याकरिता! अकल्पितेनं त्याचा हात धरला अन् त्याला घेऊन आपल्या घरी गेली.

**अरुणा** : आपल्या घरी? कशाला ?

**वसंता** : त्याच्यावर ऊपचार करणार आहे म्हणे!

**अरुणा** : तरीच काल तो नाटकाला आला नाही. तो का आला नाही हे विचारायलाच मी आता इथे आले होते ---- आता माझं कसं होईल रे (भावनातिरेकाने रडू लागते)

**वसंता** : रडू नको अरुणे! नको रडू! माझा मित्र असा विश्वास घातकी निघाला याची मलाही लाज वाटू लागली आहे. पण रडून प्रश्न सुटत नसतात. पूस ते डोळे. हं अस्सं! काढूं हं आपण यातून कांही मार्ग. चांगला धडा शिकवूं बेटयाला! ---- पण प्रथम फर्स्ट क्लास पैकी चहा घेऊ. सकाळचा चहा अजून व्हायचा आहे माझा. वेट ए मिनिट. आता चहा करुन आणतो ----

**अरुणा** : तू कशाला? मी करते ना.

**वसंता** : नो नो नो! यु आर माय गेस्ट टुडे! तू बस ते मासिक चाळत. मै अभी आया! (किचन मध्ये जातो. अरुणा थोडा वेळ मासिक चाळते. मग इकडे तिकडे पाहते. कॉटकडे नजर जाते)

**अरुणा** : बाई बाई! लोळून लोळून चादर पाहा कशी गोळा केलीय (चादर नीट करावयास जाते. ऊशी उचलते. ऊशीखालचा ताईत कुतुहलाने अरुणा हातात घेऊन पाहते.)

( डोळे तारवटतात. घुमणारे संगीत. ताईत पुन्हा हातातून गळून बिछान्यावर. अरुणा ताठ ऊभी. वसंता चहाचे कप घेऊन येतो. एक तिच्या हाती देतो. एक स्वतः घेतो. खुर्चीवर बसून चहाचे घोट घेऊ लागतो. अरुणाला म्हणतो)

**वसंता** : अग घे ना! चहा घे. हे पहा चहाला नाही म्हणायचं नाही ( ती उभ्या उभ्याच चहा पिऊ लागते) अग बसून पी (तिला दुसऱ्या खुर्चीवर बसवतो) हा अस्सं! कसा झाला चहा?

अरुणा : लाडक्या किती छान चहा करतोस रे!

वसंता : आँ! (चहाचा कप खाली पडतो)

अरुणा : असा काय आ वासून पाहतोस? कधी पाहिलं नाही आपल्या अरुणेला.

वसंता : आपल्या? (मटकन् खाली बसतो)

अरुणा : अहाहा! काय पण एक माणूस भोळं बनून राहिलं! (त्याच्या डोक्यावर टपली मारत) एवढं कसं कळत नाही. ?

वसंता : काय?

अरुणा : आता स्पष्टच करावं लागेल का रे? माझं तुझ्यावर प्रेम जडलंय!

वसंता : (ओरडतो) नाही! नाही! (मग एकदम डोक्यात प्रकाश पडल्यासारखा उठतो) हा! हा! आलं लक्षात.

अरुणा: (आनंदानं) आलं ना लक्षात?

वसंता : आलं कां म्हणजे सर्व आलं. अरुणे, अरुणे, यू आर ग्रेट. काय पण युक्ती काढलीय? एकदम रामबाण! अनंताला हे समजलं की तो जळून खाक! एकदम डोळे उघडतील त्याचे! खाडकन! अकल्पितेवर प्रेम करतोस का लेका? हिला बनवून?

अरुणा : आपल्याला काय करायचं?

वसंता : काय करायचं ते सर्व आता माझ्या लक्षात आलंय! तूं फिकिर करु नकोस! मी अशी फर्स्ट क्लास भूमिका वठवीन की देखते रहेना. पण -

अरुणा : माझ्या राजा आता कसला आला पण? तुझा पण मी जिंकलाय हं आधीच! आता पाय मागे घेऊ नकोस. (उठून उभी राहते. त्याच्या जवळ जाण्यासाठी)

वसंता : (तिच्यापासून दूर होण्यासाठी नकळत पाय मागे घेतो) पाय मागे घेण्याचा प्रश्नच नाही! पण प्रेमाचा मला तसा अनुभव नाही! प्रेमात पडलेली जोडपी कसं वागतात, कसं बोलतात –

अरुणा : (त्याच्याकडे अतिशय प्रेमळपणे पहात) लाडक्या! मी शिकवीन रे सारं! अन् खरं सांगू कां एकदा मनात ठसलं ना की सारं आपोआप येतं.

वसंता : आपोआप येतं? नाही पण त्या लेकाच्या डोळयात अंजन

घालायचं तर थोडी तालीम करायलाच हवी. कसं परफेक्ट व्हायला पाहिजे काम ----( तालमीचा मूड घेत) अरुणे! माझ्या प्राणप्रिये-!

**अरुणा** : ( अरुणा एकदम हर्षभरानं) वसंता! लाडक्या! माझं प्रेम तूं स्वीकारलसं? अहाहा! आज मला किती आनंद झाला म्हणून सांगू.(दारात अनंता येऊन उभा राहतो! त्या दोघाचं त्याच्याकडे लक्ष नाही)

**वसंता** : (तिची हनुवटी धरुन) आणि लाडके! मला तर स्वर्ग दोनच बोटं उरला आहे असं वाटतं! असं वाटतं! असं वाटतं की -----

**अनंता** : (एकदम ओरडतो) की तुला थेट स्वर्गातच पाठवावं (दोघे एकदम दूर होतात.)

**वसंता** : अच्छा म्हणजे मुक्याला वाचा फुटली तर?

**अनंता** : तुमच्या चोरटया प्रेमप्रकरणाला वाचा फुटली आहे. (वसंताच्या अंगावर धावून त्याची कॉलर पकडीत) वशा! लेका मित्राशी दगलबाजी!

**वसंता** : (शांतपणे हात काढीत) मित्राशी दगलबाजी आधी कोणी केली हे तू आपल्या मनालाच विचार.

**अनंता** : मी? मी कोणाशी दगलबाजी केली नाही.

**वसंता** : असं! मग काल तुझं अकल्पितेबरोबर जे काय चालू होतं , जे मी प्रत्यक्ष माझ्या डोळयांनी पाहिलं , ते काय नाटक?

**अनंता** : वशा त्याचा आधार घेऊन जर तूं यातून सुटू पाहशील तर ते जमणार नाही. सांगून ठेवतो.

**वसंता** : सुटू पाहण्याचा प्रश्नच नाही. आमचं एकमेकावर खरंखुर प्रेम आहे !काय ग अरुणा?

**अरुणा** : (लाजून) इश्य! कितीदा विचारताय?

**अनंता** : अरुणा--

**अरुणा** : ओरडतोस कशाला? मी काही कोणता गुन्हा केला नाही.

**अनंता** : माझ्या ह्रदयाच्या चिंधडया उडवल्या असतांना पुन्हा वर तोंड करुन म्हणते मी गुन्हा केला नाही?

**अरुणा** : नाहीच मुळी! माझं वसंतावरच खरंखुरं प्रेम आहे. वसंता! लाडक्या! खरं की नाही?

**वसंता :** अगदी खरं!

**अनंता :** अरे रे! आजपर्यंत मी समजत होतो की माझ्यासारखा भाग्यवान हया जगात कुणी नसेल. अरुणा !तुझ्या प्रेमाच्या सुख सागरात विहार करतांना मी अजून बेकार आहे याचं सुध्दा मला दुःख बोचत नसे. वशासारखा जीवास जीव देणारा मित्र अन् तुझ्यासारखी प्रेयसी! मी अगदी सुखाच्या शिखरावर होतो. आजपर्यंत! पण --- पण --- एक धक्का देऊन तुम्ही दोघांनी मला दुःखाच्या दरीत लोटून दिलं ---

(कॉटवर डोकं धरुन बसतो. वसंता अरुणाला एकीकडे नेतो. कुजबुजतो. गोळी लागू पडली आहे असे हातवारे करतो. खरं तर अरुणा ब्लँक. नुसती भारावल्यासारखी वसंताकडे पहात राहते. इतक्यात नाना आंत येतात. वसंता एकदम दूर. नाना दुसऱ्या खुर्चीवर बसतात. धापा टाकतात.)

**वसंता :** नाना! तुम्ही कशाला वर आलांत? कांही काम होतं का? मला बोलवायचं. नाहीतर अंबूला पाठवायचं. आधीच तुमचं ब्लडप्रेशर वाढलेलं. मग हा जीना चढून वर येण्याची कांही गरज होती का?

**नाना :** (धापा टाकत) गरज होती म्हणून तर आलो. नानी म्हणाली स्वतः वर जा आणि वसंतरावांना जेवायला येण्याचं आमंत्रण द्या. आमच्या कडून आज फीस्ट आहे तुम्हाला वसंतराव! वसंतराव!! अहो नानी अगदी खूष आहे तुमच्यावर . वा !वा !काय किमया केलीत?

**वसंत :** नाना! नाना कशाला तसदी घेताय? अहो ----

**नाना :** हॉ !हॉ! हॉ! नाही म्हणायचं नाही. काल आम्ही तुमचं तोंड गोड करु शकलो नाही. स्वतःच्या खर्चानं! तेव्हा आता नाही म्हणू नका. (अनंताकडे पहात) अनंतरावांना सुध्दा घेऊन या!

**नाना :** (अनंताकडे जात) अनंतराव तुम्हाला माहित झालंच असेल, आपले वसंतराव आता लक्षाधीश झाले. त्या आफ्रिकेत असणाऱ्या काकांची इस्टेट मिळाली त्यांना. किती विचारा? दहा लाख!

**अनंता :** काय? दहा लाख?

**नाना :** विश्वास बसत नाही ना? अहो बातमीच तशी आहे! पण स्वतः सालिसीटर लोचट काल रात्री येऊन गेले. त्यांनीच तर काकांचं मृत्युपत्र वाचून दाखवलं -----

अनंता : वसंता खरं आहे?
वसंता : हो!
अनंता : तर असं आहे काय? (आपल्या विचारात पुन्हा गुंग)
नाना : हो ना
अरुणा : वसंता! मी जाते. येईन पुन्हा. बाय बाय.
(जाऊ लागते इतक्यात)
(तिला अडवित) अग, तूं कुठं निघालीस? अनंतरावांना
नाना :
आमंत्रण दिल्यावर तुला वेगळं बोलावणं हवं की काय?
अरुणा : तसं नाही नाना! पण ---
आता पण नाही आणि परंतु नाही. इथेच थांब! फारच
नाना :
परकेपणानं वागायला लागली पोरटी ----
वसंता : (बाजू सावरण्याच्या प्रयत्नात) छे छे नाना! परकेपणा कसला
आपल्या घरी? अंबूची मैत्रीण ही -- म्हणजे तुमचं घर तिला परकं कसं
होईल?
वसंतराव बरेच आहात की तुम्ही -- अंबूची मैत्रिण काय [illegible]ळ?
नाना :
--- (अनंताकडे साभिप्राय पाहतो. इतक्यात खालून नानीच्या हाका ऐकूं
येतात)
(बाहेरच्या दारातून) आलो आलो (सर्वांना) नानी बोलावतेय.
नाना :
आलोच हं मंडळी . कांही तरी आणायचं असेल दुकानातून! चालू द्या
तुमचं----
(नाना जातात. अरुणा खुर्चीवर बसते, टेबलावरचं मासिक चाळत. अनंता
कॉटवरच अरुणाकडे टक लावून पाहतो. वसंता मध्ये उभा – अवघडल्यासारखा)
वसंता : (तंग वातावरणाला सैल करण्याच्या प्रयत्नात) तर मग अनंता!
आता तुला कळलंच असेल तेव्हा जरा थंड डोक्यानं ----
अनंता : थंड डोक्यानंच विचार केल्यावर मला सारं स्पष्ट दिसू लागलं.
ह्या–ह्या अरुणेला तुझ्या दहा लाखाची मोहिनी पडली अन्
माझ्यासारख्या बेकाराला ती विसरली . साहजिकच आहे.
वसंता : साहजिक काय आहे? ती तुला प्रथम विसरली की तू तिला
प्रथम? अकल्पितेसारखी श्रीमंताची पोरगी गटवल्यावर! चोर तो चोर

अन् वर शिरजोर!

**अरुणा** : जाऊ देना वसंता? कशाला त्याच्या तोंडी लागतोस?

**वसंता** : काय जाऊ दे? वाटेल ते आरोप तो तुझ्यावर करीत आहे अन् मी--

**अनंता** : अन् तूं मघापासून माझ्यावर वाटेल ते आरोप करतो आहेस ते? म्हणे अकल्पितेला गटवलं उलट ---- .

**वसंता** : उलट काय तीच आपणहून तुझ्या गळ्यात पडली?

**अनंता** : माझ्या अरुणेवरच्या प्रेमा शपथ खरं. तूं सांगितलं म्हणून काल मी मिठाई घेऊन इथं आलो तो ती एकदम मला मिठी मारायलाच धावली.

**वसंता** : कुणाला खरं वाटेल? अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी तूं सांगायला लागला.

**अनंता** : हे बघ! तिचं केव्हापासून माझ्यावर प्रेम जडलं होतं कुणास ठाऊक? पण मला कालच समजल्यावर मी हबकलोच. तुझा नि अरुणेचा विचार माझ्या मनात प्रथम आला. मग ठरवलं . शॉक बसल्याचं निमित्त केलं नि मुका बनलो.

**वसंता** : आम्हाला सफाई देणं टाळण्याकरिता?

**अनंता** : वाकडयांत शिरुं नकोस. म्हटलं श्रीमंत बापाच्या एकुलत्या एक लेकीची क्षणिक लहर असेल ही -- आपल्या मुक्याच्या बतावणीनं तिचं मन उडेलही आपल्या वरुन ----

**वसंता** : खरं म्हणतोस?

**अनंता** : गध्या. अरे तोच खुलासा करण्याकरिता मोठया मुष्किलीनं अकल्पितेचा डोळा चुकवून सकाळी सकाळी इथं आलो -- माझं नशीब फुटलं हे पहायला. ( कपाळाला हात लावून बसतो. वसंता खो खो हसू लागतो. अनंता त्याच्याकडे प्रथम आश्चर्यानं पाहतो. नंतर त्याला हळूं हळूं राग येऊ लागतो. वसंता पोट धरुन धरुन हसतोच आहे. शेवटी राग अनावर होऊन अनंता ताडकन् उठतो अन् त्याची मनगुट पकडतो)

**अनंता** : विश्वासघातकी! हसून वर दुःखावर डागण्या देतोस?

**वसंता** : (मान सोडवून घेत हसण्याची ऊबळ आवरत) अरे नाटक! नुसतं

नाटक होतं ते.

**अनंता :** (थक्क) नाटक? कशासाठी?

**वसंता :** तुझे डोळे उघडावे म्हणून? तू अकल्पितेच्या प्रेमात पडला असं समजून आम्ही दोघांनी मुद्दाम प्रेमाचं नाटक केलं ( पुन्हा खो खो हसू लागतो)

**अनंता :** (उजळलेल्या चेहऱ्यानं अरुणाला) होय कागं लबाडे?

**अरुणा :** (स्पष्ट पणे) मुळीच नाही ( वसंताचं हसणं ब्रेक लागल्यासारखं बंद. अनंता आश्चर्यचकित)

**अनंता :** म्हणजे तुझं खरोखरच ----

**अरुणा :** वसंतावर प्रेम जडलयं -- ( निघून जाते )

( वसंता अन् अनंता एकमेकांकडे थिजल्यासारखे पहात राहतात. इतक्यात प्रेमानंद महाराजांचा एकदम आंत प्रवेश.)

**प्रेमानंद :** अलख निरंजन!

**वसंता :** ( शुध्दीवर येत ) कोण महाराज? गुरुमा ऊली! ( एकदम पाय धरतो)

**प्रेमानंद** ( महाराज आशीर्वाद देत ) अलख निरंजन !हा कोण?

**वसंता :** ( त्याला नमस्कार कर अशी खूण करत ) हा माझा मित्र अनंता.

**अनंता :** नमस्कार करतो महाराज ( नमस्कार करतो साधा हात जोडून )

**महाराज :**( बिछान्यावर जाऊन बसतो. बिछान्यावरचा ताईत त्याच्या पृष्ठभागाला रुततो. विव्हळल्यासारखं ) अलख निरंजन ( ताईत दाखवतो )

**वसंता :** मीच तिथे लपवला होता महाराज. घोटाळा होऊंनये म्हणून.

**महाराज :**घोटाळा! कसला घोटाळा?

**वसंता :** ( रडक्या आवाजात ) साराच घोटाळा झाला महाराज?

**महाराज :**साराच?

**वसंता :** डोकंकाम करीत नाही.

**महाराज :**अकल्पिता तुझी झाली नाही?

**वसंता :** ती याची झाली!

**महाराज :**याची?

**अनंता :** होय महाराज! अन् माझी प्रेयसी अरुणा, तिचं याच्यावर मन जडलं.

**महाराज :**असं कसं झालं? ताईत नीट वापरला नाही कां?

**अनंता :** ताईताचं कामच पडलं नाही महाराज. अकल्पितानं माझ्या वर प्रेम असल्याचं अचानक जाहीर केलं. अन्... ..

**वसंता :** अरुणा माझ्या पैशावर भुलली! तिचं मन पालटलं ..

**महाराज :** ताईताचा स्पर्श कुणालाच झाला नाही?

**वसंता :** अंबूला झाला.

**महाराज :**कोण अंबू?

**वसंता :** आमच्या घरमालकाची मुलगी ..

**महाराज :**मग त्यावेळी समोर कोण होतं?

**वसंता :** ( केविलवाणं ) मी!

**महाराज :**मग तिचं तुझ्यावर मन गेलं नाही?

**वसंता :** ( केविलवाणा सूर ) गेलं ना? पण हा अनंता म्हणतो -

**महाराज :** ( दरडावून ) काय म्हणतो हा अनंता?

**अनंता :** म्हणजे माझा तसा संशय आहे!

**महाराज :**संशय? ताईताबद्दल संशय? ( रागात ) अलख निरंजन!

**अनंता :** ( विशेष घाबरत नाही ) म्हणजे तसं समजण्याला पर्याय आहे!

**महाराज :**कोणता पर्याय?

**अनंता :** अहो अंबू तुम्ही पाहिली नाही .अहो तिचं लग्न जमणं म्हणजे आमच्या नानांना डोकेदुखीच होती ..

**वसंता :** म्हणून ताईताच्या स्पर्शाचं निमित्त करुन ही अंबू माझ्या गळयांत पडली असं - - -

**महाराज :**( रागानं ) या अनंताचं म्हणणं?

**वसंता :** क्षमा असावी महाराज!

**अनंता :** पण असा संशय -

**महाराज :**मूर्ख आहात दोघं! बेअक्कल! अरे मला सगळं कळू शकतं! अंतर्ज्ञानानं.

**वसंता :** अगदी गाढव आहे हा अनंता! महाराज क्षमा असावी पण अंबू

सोडून इतरांना ताईताचा स्पर्श झालेला आम्ही तरी पाहिला नाही .....

**महाराज** :आम्ही पाहतो! अलख निरंजन!

( डोळे मिटतात. वसंता त्यांच्या पायाशी बसून भक्ती भावानं हात जोडून त्यांच्या चेहऱ्याकडे पाहू लागतो. अनंता दोलायमान अवस्थेत टेबलाजवळच्या खुर्चीवर बसतो. थोडा वेळ सस्पेन्स. मग महाराज मोठयानं. हसू लागतात )

**महाराज** :हा हा हा! असा घोटाळा झाला काय? सारीच गंमत आहे. ( डोळे उघडतो).

**वसंता** : काय दिसलं महाराज?

**महाराज** :सारं स्वच्छ दिसलं! हा ताईताचा प्रताप..

**अनंता** : खरंच?

**महाराज** :( एकदम रागावतात ) अलंख निरंजन! माझ्यावर अविश्वास?

**वसंता** : ( एकदम पाया पडतो अनंताला सावरुन घेण्यासाठी) तसं नाही महाराज. आम्ही सामान्य माणसं. अज्ञानी. आम्हाला क्षमा असावी. अभय दान द्यावं महाराज. !

**महाराज** :( निवळून वसंताच्या डोक्यावर हात ठेवत ) अलख निरंजन!

**वसंता** : ( हात जोडून उभा होतो ) महाराज आता यातून सुटका?

**महाराज** :होईल!

**वसंता** : कशी महाराज?

**महाराज** :ताईतावर उलटा मंत्र जपावा लागेल!

**अनंता** : उलटा! म्हणजे?

**महाराज** :असलेलं प्रेम नाहीसं होईल.

**वसंता** : ( अत्यानंदानं ) खरंच सांगताय महाराज?

**महाराज** :( पुन्हा रागानं ) अलख निरंजन! माझ्यावर अविश्वास!

**वसंता** : ( एकदम पाय धरतो, चेपू लागतो ) नाही महाराज! पण अती आनंदानं बोलून गेलो. म्हणजे आता इतकं काही बिघडलं आहे की कशावरच विश्वास बसत नाही एकदम! गोंधळ उडाला आहे डोक्यांत. दासाला क्षमा करावी.

**महाराज** :अन् काय रे अनंता! तुला काय वाटतं?

**अनंता** : म्हणजे रागावत नसाल तर विचारतो!

**महाराज** :( हसून अभय दिल्यासारखं ) अलख निरंजन! विचार!

**अनंता** : हया ताईताचा स्पर्श झाल्यावर --

**महाराज** :जो पहिला पुरुष ती तरुणी पाहिल - -

**अनंता** : त्याबद्दल तिला प्रेम वाटणार नाही हे खरं!पण?

**महाराज** :पण?

**अनंता** : पण निश्चित कोणती भावना तिच्या मनात उत्पन्न होईल महाराज?

**महाराज** : ( घोटाळतात - विचार ीमुद्रेन ) ते मला हि सांगता येणार नाही कारण ... ... ..

**अनंता** : ( अधिरतेनं ) कारण काय?

**महाराज** :( हसून) कारण प्रेम नाहीसं करावं अशी इच्छा करणारा शिष्य मला कधी भेट ला नाही. असा ताईत मी कधी कोणाला मंत्रून देण्याचा आजवर प्रसंगच आला नाही. आमच्या गुरुमाऊल ींनी आम्हाला हा देखील मंत्र पढवला. आम्ही जप केला. बस्स! पुढचं आम्हाला माहित नाही -

**वसंता** : ( अनंताकडे रागानं पहात ) अंत्या! नुसत्या शंका कुशंका काढू नकोस? महाराज काय आपलं वाईट करणार आहेत कां? महाराज! मग हया ताईतावर उलटा मंत्र टाकतांना? प्रेम नाहीसं करणारा - - -

**महाराज** :पण आता घोटाळा करणार नाहीस ना?

**वसंता** : महाराज! आता मुळीच घोटाळा होणार नाही. ताईत आपल्या हातातच ठेवतो. अन् अंबू किंवा अरुणा प्रेमात येऊन जवळ आली की ताईताचा बेमालून स्पर्श घडवून आणतो की, प्रेम खतम!

**महाराज** :पहा बरं!

**वसंता** : तुम्ही निंश्चित रहा महाराज.

**महाराज** :अन् अनंता तूं?

**अनंता** : हयाचा प्रयोग सक्सेसफुल झाला की मग मी त्याचा प्रयोग अकल्पितेवर करीन! मला वाटते वशा! तू हयाचा प्रयोग प्रथम अंबूवरच करुन पहा.

**वसंता** : ते माझं मी पाहीन–

**महाराज** : ठीक आहे. मग दे तर तो ताईत इकडे अन् तुम्ही दोघेही इथून थोडया वेळ बाहेर जा! मंत्र एकांतात घालावा लागतो.

**वसंता** : ठीक आहे महाराज! चल अनंता! आपण महाराजांसाठी फराळाचं घेऊन येऊ. महाराज आपण आटीव दूध घ्याल ना?

आम्ही आलोच ( वसंता टेबलावरचा जग उचलतो. नंतर दोघेही बोलत बोलत बाहेर पडतात. महाराज मांडी घालतात. मुठीत ताईत पकडतात अन् डोळे मिटून जप करु लागतात. भयंकर आवाज. ताईत गरम होऊ लागतो. मंत्र पूर्ण झाल्यावर हाताला भयंकर चटका बसतो. महाराज ताईत एकदम फेकतात. त्याचवेळी आंत आलेल्या अरुणेचा त्यावर पाय पडतो. अरुणा ताठ नजरेने महाराजांकडे पाहते - कांही वेळ. महाराज हातावर फुंकर घालत असतात. त्यावेळी त्यांच्या अंगावर धावून जात -)

**अरुणा** : चांडाळा! माझा घात केलास. थांब तुझा जीव घेते. ( हात त्याच्या गळयापाशी नेते )

**महाराज** :( गडबडून उभे राहतात ) अहो कोण तुम्ही? असं काय करता?

**अरुणा** : कोण तुम्ही काय? गोसावड्या - मला विसरलास! विश्वास घातक्या! मला माणसातून उठवलंस - थांब तुझा गळा दाबून जीव घेतल्याशिवाय मी राहणार नाही - बरा सापडलास - ( महाराजांच्या गळयाशी पुन्हा हात नेते. ते झटकून महाराज प्रथम खोलीभर धावतात. बचाव - बचाव ओरडत .. अरुणा मागेच - बाहेरच्या दरवाज्यातून सटकतात. अरुणा त्यांच्या मागे धावत जाते. कांही वेळ शांतता - ताईत मध्ये पडला आहे. त्यावर स्पॉट - अकल्पिता लोचटचा हात धरुन त्याला ओढत आणते. त्याला उभा ठेऊन आतल्या खोलीत डोकावते. पुन्हा बाहेर येते ..

**अकल्पिता** : वसंता घरात नाहीय.

**लोचट** : ( सुटकेचा निश्वास टाकत ) नाही? मग मी जातो.

**अक** : ( दरडावून) जाता कुठं? बसा त्या खूर्चीवर - वशा येईपर्यंत मुकाटयानं ( खुर्चीकडे बोट दाखविते. लोचट खुर्चीत बसतो ) हं अस्सं! बोला. जाब द्या. ( लोचट काहीच बोलत नाही. )

**अक** : अहो बोला म्हणते ना. जाब द्या. सकाळी सकाळी बाबासाहेबांना

वसंताला इस्टेट मिळणार असल्याची बातमी सांगायला येण्यात तुमचा अन् त्याचा काय डाव आहे? बोला. ( लोचट गप्प )

**अक :** अहो बोलत का नाही? की तुमची सुध्दा वाचा गेली त्या अनंता सारखी?

( लोचट नाही म्हणून मान हलवतो )

**अक :** नाही नं? बोलत का नाही मग? ( तो तोंड घट्ट मिटून तोंडावर बोट ठेवतो )

**अक :** ( चिडून त्याच्या अंगावर धावून त्याच्यावर हात उगारते ) लोचट, तुम्ही आता तोंड उघडता की -

**लोचट :** ( घाबरुन ) हो. हो. पण तुम्हीच तर मघाशी म्हणाला की मुकाटयानं बसा म्हणून. वसंतराव येई पर्यंत -

**अक :** हो. पण बसून बोलायला हरकत नाही. समजलं?

**लोचट :** समजलं.

**अक :** मग बोला.

**लोचट :** काय बोलू?

**अक :** छान. हे सुध्दा मीच सांगू? बोला. किती कबूल केले वसंतानं तुम्हाला. हे मृत्युपत्राचं नाटक उभं करायला. किती दिले? ( बोटांनी पैसे खुणावते )

**लोचट :** काही नाही हो. एक चहाचा कप. तो सुध्दा मी मागीतला म्हणून.

**अक :** मी चहाच्या पिपात बुचकाळते तुम्हाला. तुम्ही मला खरंखरं सांगितलं तर.

**लोचट :** खरंखरं तर सांगितलं. वसंतरावांना त्यांच्या आफ्रिक्तेल्या काकांची इस्टेट मिळणार आहे. त्यांनी सहा महिन्यांच्या आत लग्न केलं तर .अन्यथा -

**अक :** काल्पनिक काकाची काल्पनिक इस्टेट. लोचट मला काय तुम्ही बावळट समजता? एकदम कालच कसा उपटला हा आफ्रिकेचा काका - नाटकातल्या सारखा - वसंता आणि तुम्ही दोघंही मला बनवता काय?

**लोचट :** नाही हो, काका खरा आहे. म्हणजे होता. गेले बिचारे वर. मृत्युपत्र करुन - वसंतरावांच्या नावाने.

अक :  आणि हे सगळं आजच सकाळी बाबासाहेबांना सांगायची काही गरज? घाई गर्दीनं? लोचट मला समजत का नाही. माझं अनंतावर प्रेम जडलंय हे तुम्हाला पाहावत नाही म्हणून –

लोचट : अहो मला कुणाचंच प्रेम जमलेलं पाहावत नाही हो - मी ब्रम्हचारी असल्यानं.

अक :  पांचटपणा पुरे. माझं अनंतावर प्रेम जडलंय हे पाहून वसंतानं हा डाव टाकला. त्याच्या इस्टेटीवर भाळून मी अनंताला सोडीन काय?

लोचट : तसं काही मला माहित नाही हो. हा अनंता कोण काळा की गोरा मला माहित नाही.

अक :  अनंतावरचं माझं प्रेम कधीच ढळणार नाही. समजलं?

लोचट : चांगलं समजलं. वसंतरावांना ते आले की त्यांना हे सांगा. आणि मला जाऊ द्या.

अक :  जाऊ द्या? देईन. त्याच्यासमोर तुमची साक्ष काढीन - आणि मग.

लोचट : ( साक्ष शब्द ऐकल्याबरोबर अंगात संचारल्यासारखा ताठ उभा राहून ) साक्ष? कोर्टातली साक्ष! हया सालीसीटरची साक्ष? हो. हो. साक्ष देईन. हा. हा. पुरुषोत्तम रामचंद्र लोचट म्हणजे पु.रा.लोचट सालिसीटर ईश्वरसाक्ष खरे सांगेन. खोटं सांगणार नाही. वसंतरावांना त्यांच्या आफ्रिकेतल्या काकांची इस्टेट मिळणार आहे. दहा लाख. त्यांनी काकांच्या मृत्युनंतर सहा महिन्यांच्या आत लग्न केले तर, कोणत्याहि मुलीशी. पण सहा महिन्याच्या आत .... ( बोलत राहतो )

अक :  ( स्वगत ) हा तसा बधायचा नाही. हयाच्यावर प्रेमाचं जाळंच टाकायला हवं. तरच वळेल हा ब्रम्हचारी. ( उघड ) पुरुषोत्तम -- ओह पुरु डार्लींग!

लोचट : डार्लींग? ( इकडे तिकडे पाहतो ) इथं दुसरं कुणीच नाही. अकल्पिताबाई?

अक :  बाई! इश्य! पुरु लाडक्या मी बाई दिसते तुला?

लोचट : नाही. पण मग काय म्हणू?

अक :  नुसतं अक्लपिता म्हण माझ्या पुरु...

**लोचट** : अकल्पिता? नुसतं? बाई तुम्हाला झालं तरी काय? आतापर्यंत तर तुम्ही चांगल्या होत्या.

**अक** : माझं मन जडलंय तुझ्यावर. डार्लींग, तुझ्या बाणेदारपणावर मी भाळलेय. तुझ्या मर्दपणावर .

**लोचट** : ( आ वासतो. मग भानावर येत ) अहो पण आतापर्यंत तर तुम्ही रागावल्या होत्या माझ्यावर. दरडावणं काय, जाब मागणं काय, साक्ष काय--

**अक** : ( लाडीक सुरात ) सगळं खोटं खोटं. मुद्दाम आव आणला होता मी. तुझी परीक्षा पाहण्यासाठी. आणि डिअर तू माझ्या परीक्षेत उतरलास. ह्रदयात ठसलास.

**लोचट** : आणि तो अनंता–

**अक** : त्याचं काही माझ्यावर खरं प्रेम नाही. तुझ्यासारखं. त्याचा डोळा आहे माझ्या इस्टेटीवर - लोचट -

**लोचट** : कोण मी?

**अक** : तू नाही रे. तो मेला अनंता --- अस्सं अस्सं म्हणजे विनोद केलास तू स्वतःवर. खरंच किती स्पोर्टींग स्वभाव आहे रे तुझा. तुझ्या बाणेदारपणावर आणि अशा स्पोर्टींग स्वभावावरच मी पहिल्यापासून भाळले होते. पहिल्यापासून खूप छळलंय मी तुला परीक्षेसाठी. ओः मॉय पुअर डार्लींग! ये !मला आपल्या मिठीत घे ना!

**लोचट** : ( आनंदानं गदगदलेल्या सुरात) अहाहा! परमेश्वरा! तू किती किती दयाळू आहेस. खरंच, तुझ्याकडे देर आहे पण अंधेर नाही. देवा, मी समजत होतो की तुझं माझ्याकडे लक्षच नाही. मी असाच ब्रम्हचारी राहणार ---- मला काय माहित की तू माझ्यासाठी ही सौंदर्याची खाण निर्माण करुन ठेवली आहेस म्हणून. माझ्या डोळयांवर, कानांवर माझा विश्वासच बसत नाही. मी स्वप्नात तर नाही नां? अकल्पिते डार्लिंग ये, अशी जवळ ये. मला चिमटा काढ.

**अक** : ( लाजण्याचा अभिनय करुन ) इश्य! हे काय?

**लोचट** : हाय! मार डाला. ( तिला मिठीत घ्यायला धावतो. अकल्पिता मागेमागे जाऊ लागते. नकळत तिचा पाय मध्ये पडलेल्या ताईतावर

पडतो. भयानक संगीत, ताईताचा प्रभाव. अकल्पिता लाकडासारखी ताठ. डोळे वटारलेले. एक क्षण. लोचटकडे पाहते - त्याची मान पकडण्यासाठी हात पुढे करुन - )

**अक :** चांडाळा!, नराधमा! माझा घात केलास. माझ्यावर प्रेमाचं नाटक करुन मला आयुष्यातून उठवलंस. थांब. मी तुला अशी सोडणार नाही. दुष्टा, तुझा गळा दाबून तुला ठारच करते. ( त्याचा गळा दाबायचा प्रयत्न करते.)

**लोचट :** अकल्पिते! लाडकेअगं तुला असं काय झालं एकाएकी? अशी काय बडबडतेस? वात झाल्यासारखी. अगं तुझं माझ्यावर प्रेम आहे ना?

**अक :** प्रेम? तुझ्यावर? नराधमा तिरस्कार करते मी तुझा. माझं आयुष्य बरबाद करणाऱ्या मवाल्या तुला ठार केल्याशिवाय मी राहणार नाही.

( लोचट भीतीने पळू लागतो. अकल्पिता त्याच्या मागे, हात गळा दाबण्यासाठी समोर करुन, खोलीतल्या खोलीत एक दोन फेऱ्या, मग किचन मध्ये जातात, तिथून डायरेक्ट समोरच्या दाराकडे जाऊन ही जोडगोळी बाहेर पडते. स्टेजवर एक क्षण कुणीच नाही. ताईत मध्यावर तसाच पडलेला. काही वेळ गेला असं दर्शविणार संगीत - नंतर वशा व अंत्याचा प्रवेश. वसंताच्या हातात मिठाईचा पुडा व अनंताच्या हातात दुधाचा जग -)

**वसंता :** ( कॉटकडे नजर जाते ) अरे! महाराज कुठाय?

**अनंता :** अंतर्धान पावले!

**वसंता :** अंत्या! पुन्हा थट्टा.

**अनंता :** किचन मध्ये तर नाही? ( किचन मध्ये जातो. किचन मधून बाहेर येत ) नाही!

**वसंता :** कुठे गेले?

**अनंता :** ( दुधाचा जग टेबलावर ठेवत ) पळाले!

**वसंता :** पण कां? ( त्याला मिठाईचा पुडा टेबलावर ठेवायला देत ) काय झाले?

**अनंता :** कांही झालं नाही म्हणूनच पळाले.

**वसंता :** अंत्या! कोडयात बोलू नको. सरळ सांग.

**अनंता :** मला तेव्हाच शंका आली होती - पण म्हटलं तू पुन्हा मला वेडयात

काढशील.

**वसंता** : आता काढतो! तू असं बोलत राहशील तर!

**अनंता** : मी कांही चिनी किंवा जपानी भाषेत बोलत नाहीय. मला जे सरळ दिसत आहे ते तुझ्या श्रध्देची झापड लागलेल्या डोळ्यांना दिसत नाही!

**वसंता** : म्हणजे?

**अनंता** : ( हसत ) अरे तुझ्या महाराजांना मंत्र वगैरे कांही एक येत नाही. त्या ताईताचं वशीकरण फेल झालं हे पाहून त्यानं पोबारा केला.

**वसंता** : फेल झालं? अंत्या! अरे तुझ्यासमोर त्यांनी अंतर्ज्ञानानं पाहून सांगितलं ना की - - -

**अनंता** : वशा! तू अगदी बिनडोक आहेस. हे सगळं प्रकरण तो महाराज आपल्या ताईताच्या प्रभावानं झालं असं सांगणार नाही तर काय -

**वसंता** : अच्छा! म्हणजे आपलं बेंड फुटू नये म्हणून त्यांनी पोबारा केला!

**अनंता** : पडला उजेड टाळक्यांत! अरे कसचं वशीकरण अन् कसला उलटा मंत्र. आपल्या दोघांनाही बाहेर घालवलं. अन् ताईतासकट सुबाल्या -- ( ताईत पायाला टोचतो ) आईग! ( नाचत सुटतो )

**वसंता** : ( ताईत उचलत ) ताईत! गरम आहे.

**अनंता** : अरे ताजा ताजा मंत्र टाकला आहे ना म्हणून असेल गरम! पुन्हा बसला कां विश्वास?

**वसंता** : तसं नाही रे! पण अंबूवर प्रयोग करुन पाहायला काय हरकत आहे. कळून येईल खरेखोटेपणा ---

**अनंता** : वत्सा! तुझ्या इच्छेबाहेर मी नाही. पण अंबूला तू आपली प्रयोग शाळा बनवावं हे काही आपल्याला पसंत नाही बुवा ( अंबू बाहेरुन हाक मारते )

**अंबू** : वसंतराव! अहो पानं मांडली आहेत. येता ना खाली?

**अनंता** : ( वसंतास डोळे मिचकावीत ) आली! वशा तुझी प्रयोगशाळा आली.

**वसंता** : अंत्या! तू जरा..

**अनंता** : किचन मध्ये जातो. चालू दे तुझा महान प्रयोग! ( अनंता

किचनमध्ये पळतो).

**वसंता :** ( मुठीत ताईत - आवाजात प्रेमळपणा आणून ) अंबू! आत ये ना! अशी बाहेरुन का हाक मारते ?..

**अंबू :** ( बाहेरुन आत येते. लाजून एका कडेला उभी राहते)

**वसंता :** रागावलीस वाटतं! सकाळी मी जरा घुसमुसळ्या सारखंच वागलो. माफ कर हं मला! ( नाटकीपणे तिच्या पायाशी गुडघे टेकतो )

**अंबू :** ( लाजून दूर होत ) इश्य!.

**वसंता :** ( उठून उभा राहत ) नाहीच माफ करणार मला?

**अंबू :** पण मी रागावलीच नाही.

**वसंता :** लाडकेमग अशी दूर का?

**अंबू :** मलाबाई लाज वाटते.

**वसंता :** माझी कसली लाज? आता आपण परकेका आहोत. एकमेकांना?

**अंबू :** नाही!

**वसंता :** मग?

**अंबू :** ( लाजून चूर होत ) तुम्हीच माझ्याकडून वचन घेतलंय नां?

**वसंता :** कसलं?

**अंबू :** लग्नाच्या आधी मर्यादा सोडायची नाही म्हणून. (वसंता डोक्यावर हात मारतो )

**अंबू :** ( हसून ) म्हणाले लग्नाआधी मर्यादा सोडलेली मला आवडत नाही.

**वसंता :** अगं ते इतकं शब्दाशः कां घ्यायचं असतं?

**अंबू :** शिवाय नाना नानींना पण आवडणार नाही तुमच्या जवळ बसलेलं.

**वसंता :** इथं कशाला येतायेत्त नाना नानी आता

**अंबू :** नानांचा कांही नेम नाही ( जायला निघते .. जाता जाता ) येता न मग जेवायला? पानं मांडली आहेत.

**वसंता :** ( एकदम हताश - मग एकदम नाटकीपणे ) आईग! (छातीवर हात ठेवतो )

**अंबू :** ( घाबरुन जवळ जाते ) काय झालं?

**वसंता** : इथे कळ आली, एकदम ( तिचा हात धरावयास जातो)

**अंबू** : ( एकदम लक्षात आल्यासारखी दूर पळते ) चला! नाटकी कुठले!

**वसंता** : ( तिच्या मागे पळत ) अंबू! प्रिये! अशी काय पळतेस! मी तुझा लाडका वसंता ना! मग .. .. ..

**अंबू** : ( पळू लागते! वसंता तिच्यामागे .खिडकी जवळचा स्टूल उचलून त्याला मारण्याचा अविर्भाव करते. तो जरा मागे होतो. तितक्यात दारापाशी जाते. उभी राहते. ) एका माणसाची कशी फजिती झाली. ( हसत हसत पळून जाते. वसंता गोठून उभा - मुठीत ताईत तसाच)

**अनंता** : ( बाहेर येत) काय म्हणतो प्रयोग? फसला?

**वसंता** : अगदी पार फसला. अनंता आता काय रे करायचं?

**अनंता** : आता प्रथम खाली जेवायला जायचं.

**वसंता** : अंत्या! अंत्या!! इथं माझं मरण ओढवलंय आणि तुला जेवण सुचतं!

**अनंता** : आपल्याला भूक लागली बुवा ( टेबलावरील जग मधील दूध पिऊन टाकतो ).

**वसंता** : अन् माझा फास्ट फ्रेन्ड म्हणवतो. ( अनंताचं लक्ष आता मिठाईकडे जातं - वसंता ती पटकन उचलून घेत )

**वसंता** : माझ्या प्रेमाचा बोऱ्या वाजला म्हणून मिठाई वाटत सूट गावभर-

**अनंता** : ( शांतपणे त्याला कॉटवर बसवतो ) वशा! टेक लाईटली.

**वसंता** : लाईटली?

**अनंता** : येस.

**वसंता** : अरे पण आता अंबूचं माझ्यावरचं प्रेम कसं नाहींसं होणार?

**अनंता** : काही गरज नाही!

**वसंता** : ( आश्चर्यानं ) काही गरज नाही?

**अनंता** : मुळीच नाही.

**वसंता** : ( संशयान ) काही नवीन उपाय सुचतो आहे का तुला?

**अनंता** : होय !

**वसंता** : ( त्याच्या गळयाला एकदम मिठी मारुन ) सांग! सांग मेरे प्यारे

मै अपने कातडीकेजोडे तुमको पहनाऊंगा. ताईत कैसा -

**अनंता :** ताईताचं काम नाही ..

**वसंता :** फिर ..

**अनंता :** अंबूचं गळयात पडलेलं लोढणं हे असं दूर फेकून द्यायचं (त्याला काटवर ढकलून देतो)

**वसंता :** ( कॉटवरुनच ) बापरे ! मग नाना - - -

**अनंता :** घाबरतोस कशाला? तू आता लक्षाधीशआहे. नाना तुझं काय वाकडं करणार आहेत? सरळ सांगायचं माझं प्रेम अंबूवर कधीच नव्हतं. तीच माझ्या गळयांत पडली म्हणून! काय करणार आहेत ते?

**वसंता :** केस करतील ..

**अनंता :** . पुरावा..

**वसंता :** सालीसिटर लोचट.

**अनंता :** त्याला पैसे चारुन चूप बसवू.

**वसंता :** पैसे आणू कुठून?

**अनंता :** विसरलास. तू लक्षाधिश आहेस.

**वसंता :** आहेस नाही! होईन! सहा महिन्याच्या आंत लग्न केलं तर!

**अनंता :** मग कर!

**वसंता :** ( वेडावित ) मग कर! पोरी काय वाटेवर पडल्या आहेत? शिवाय अकल्पितेशिवाय दुसरीचा मी विचारही करुं शकत नाही. बेहत्तर आहे काकांची इस्टेट मिळाली नाही तरी...

**अनंता :** मग रड ..

**वसंता :** अंत्या! माझ्या भावनांची थट्टा करतोस?

**अनंता :** मुळीच नाही! वस्तुस्थिती सांगतोय.

**वसंता :** वस्तूस्थिती?

**अनंता :** होय! हे पहा वसंता अंबूशी लग्न करुन तू लक्षाधिश होऊ शकशील. पण सुखी?

**वसंता :** हीच परीक्षा केली का देवा? अरे पैशावर नजर ठेवून का मी कुणावर प्रेम केलं? अकल्पितेवर माझं खरं प्रेम आहे रे !

**अनंता :** ते विसर..

**वसंता :** काय?

**अनंता :** होय. आणि अरुणेशी लग्न कर!

**वसंता :** ( निराशेनं ) तुझ्या डोक्यावर नक्कीच परिणाम झालाय!

**अनंता :** माझी अरुणा कुणीकडून तरी सुखी व्हावी एवढीच माझी इच्छा! तिचं तुझ्यावर प्रेम आहे. ठीक आहे. ( उसासा टाकतो )

**वसंता :** अन् तू काय करशील?

**अनंता :** मी काय करीन? तुम्हा दोघांचं शुभचिंतन करीन!

**वसंता :** देवदास संचरला वाटतं तुझ्या अंगात?

**अनंता :** दुसरा उपायच नाही, आहे ही परिस्थिती मान्य केल्या वाचून. अकल्पितेचं तुझ्यावर प्रेम नाही. अरुणेचं माझ्यावरचं प्रेम उडालं - अशा परिस्थितीत आपण काय करणार - निदान अरुणेला तरी तिचं आवडतं माणूस मिळून सुखी होऊ दे - - -

**वसंता :** अकल्पितेला देखील तिचं आवडतं माणूस मिळत असेल तर मी तयार आहे.

**अनंता :** वशा! लेका! का आणखी मीठ चोळतोय..

**वसंता :** आणि माझ्या भावनांवर तिखटाचं पाणी ओतलं ते? अंत्या! टेक लाईफ अज इट कमस् असं बोलणं सोपी आहे पण कृतीत उतरवणं कठीण!

**अनंता :** अरे पण - - -

**वसंता :** प्रयत्न सोडू नकोस. सुटेल गुंता ( मुठीतला ताईत दाखवून ) या ताईतानं प्रथम अकल्पितेचं तुझ्यावरचं अन् अरुणेचं माझ्यावरचं प्रेम नाहीसं करु. अन् मग ..

**अनंता :** ( ताईत हिसकावून घेत ) हा ताईत मला आता ठेचलाच पाहिजे. वशा! अजून तुझा यावर विश्वास आहे?.

**वसंता :** ( घुटमळत ) तसं नाही! पण ....

**अनंता :** अन् समज हे सध्याचं प्रेम नाहीसं झालं तरी तुला नि मला आपापल्या आवडत्या माणसाचं प्रेम मिळेलच कशावरुन? म्हणजे आले का पुन्हा पहिले पाढे पंचावन..

**वसंता :** अंत्या! अंत्या! परिस्थितीचं इतकं क्रूर विश्लेषण तुला करवतं तरी कसं?

**अनंता** : हृदयावर दगड ठेवून - चल तू झटपट आत जा, स्नान कर आपल्याला खाली जेवाय ना जायचं आहे. उद्याच्या चिंतेत आजचं सुग्रास जेवण कशाला स्पॉईल करायचं?

( वसंताला किचन मध्ये ढकलतो. अनंता बाहेर येतो. दारात एक पाटिलबोवा उभे. डोक्याला पागोटे, धोतर, सदरा, पायात कोल्हापुरी चपला - भरदार मिशा - हातात काठी)

**अनंता** : आता तुम्ही कोण?

**पाटील** : आम्हास वळखत नाही? आमी तीर्रशिंग्याचं पाटील धोंडबाजी पाटील म्हनत्यात मला.

**अनंता** : असं! असं! पाटील पण इकडं कसं काय? वाट चुकला काय?

**पाटील** : वाट चुकलो न्हाय. बराबर आलो. कोठी हाय तुझा थो परमानंद महाराज?

**अनंता** : परमानंद महाराज? हा.. हा.. प्रेमानंद महाराज..

**पाटील** : थोच .. कोठी लपविलंस त्याले?

**अनंता** : लपवलं? कशाला?

**पाटील** : क्या बोलानं खरं सांग? कोठी लपीवलस त्याले?

**अनंता** : महाराज इथं नाही. गेले.

**पाटील** : खोटी बोलू नगस. म्या सोता पत्त्या काढला. येथी आला म्हून करलं. म्हून येथी आलो. येथीच हाये तो. माहया सोटयाले पाहून भेला असन. दडला असन येथं कोठीतरी (पाटील पलंगाखाली, टेबलाखाली पाहू लागतात ).

**अनंता** : पाटील! महाराज इथं नाही. गेले!

**पाटील** : ( किचन कडे पाहात ) तेथी असनं ( जाऊ लागतात )

**अनंता** : ( त्यांना अडवत ) किचनमध्येहि नाही - - पण पाटील तुमचा महाराजांवर एवढा राग कां?

**पाटील** : ( रागानं ) घुस्सा काऊन ? अरं! त्या कोंबडीच्यानं मले बनवलं.

**अनंता** : बनवलं?

**पाटील** : हो! मले झुटा ताईत देल्ला!

**अनंता** : ( मुठीतल्या ताईताकडे पाहात ) वशीकरणाचा ताईत?

**पाटील** : हा! मने ह्या ताईत तुह्या मनास आलेल्या पोरीवर टाकजो. मंग ती तुह्याकडे पाहील अन् - - -

**अनंता** : आन मंग ती तुले मिठीच मारन ...

**पाटील** : हो! असंच मनाला भडवा!

**अनंता** : मग? बार फुसका ठरला का?

**पाटील** : ( घुटमळत ) खोटा न्हाय मना-पर . . . .

**अनंता** : ( आश्चर्यानं ) खोटा नाही? म्हणजे तुम्ही जिच्यावर प्रेम करीत होता ती पोरगी अंगावर ताईत टाकल्यावर तुमच्या गळयात पडली?

**पाटील** : हा! पडली गळयांत! तवा . . . .

**अनंता** : तवा?

**पाटील** : हो नं! म्या माह्या लाडक्या अस्तुरीवर ताईत टाकला - थ्या परमानंद महाराजांनी देल्लेला - उसाच्या मळयात तिले घुसलेली पाहून - आन् येकदम भडकन तिनं माह्या गळयाले मिठीच मारली..

**अनंता** : मग काय पाटील? तुम्ही तर खूष व्हायला हवं! महाराजांना चांगली भरगच्च भेट द्यायला हवी - तुमची अस्तुरी तुम्हाला मिळाली म्हणून!

**पाटील** : ( एकदम रागात ) तेचं टक्कुरंच फोडतो. काठीनं! मले बनवलं?

**अनंता** : अहो बनवलं कसलं? कल्याण केलं तुमचं. तुम्हाला तुमची लाडकी अस्तुरी मिळवून दिली. आणखी काय हवं?

**पाटील** : आरं! मिळवून देल्ली म्हनजे? येक महिन्याकरता!

**अनंता** : एक महिन्याकरिता?

**पाटील** : हो नाई तं का तं! --- आरं लगीन केलं झटपट तेथंच चुकलं!

**अनंता** : चुकलं?

**पाटील** : चुकलं! आरं! लगीन करुन येक महिना होत न्हाई तर अस्तुरी आम्हाले इसरली ---

**अनंता** : विसरली? म्हणजे?

**पाटील** : वळखत पन न्हाई. कोन तुमी म्हून इचारते -- परक्यावानी वागते. मनते --- मले सोडा -- जाऊ द्या. माह्या आयेकडे -- तीन महीने झाले, जवळ येऊ देत न्हाई.

**अनंता** : ( विचारी मुद्रेनं ) म्हणजे? पाटील तिचं तुमच्यावरचं प्रेम आटलं?

**पाटील** : आरं! पिरेम आटलं तं आटलं लेकाचं. पर मले आपला नवरा म्हनाले बी तयार न्हाई ती. इचारते आपलं लगीन झालं कवा? परक्या पुरसाले मी न्हाई जवळ येऊं देनार! आता आला का न्हाई तिढा?

**अनंता** : तिढा?

**पाटील** : नायतर का! आता हिच्या बापाले कां सांगू?

थो समजन पाटलानं हिले टाकली. काडीमोड घेईल अन् दुसरं लगीन करल ----

**अनंता** : अन् तुम्हाला तर अस्तुरी आवडते!

**पाटील** : आरं निसता तडफडतो हाय तिच्यासाठी. तीन महिनं झालं! म्हून थ्या महाराजाचा पत्या काढत काढत शहरात आलो. पक्का ताईत दे अर्जंट! न्हाईतर टक्कुरंच फोडतो. (अनंताला) तेचं.

**अनंता** : पण महाराज इथून मघाशींच गेले. बहुधा त्यांनी तुम्हाला पाहिलं असावं?

**पाटील** : कुठं जाईल? साता पाताळात दडला तरी त्यास ओढून काढीन बाहेर--- पर येथं तर नाईना जी ----

**अनंता** : नाही! आले होते पण लगेच पळाले..

**पाटील** : कुठं पळंल? त्याले धुंडून काढल्या बिगर हा धोंडबापाटील राह्यानार न्हाई ( काठी आपटून जातो )

**अनंता** : ( हातातला ताईत पाहात ) असं! म्हणजे ताईताचा मंत्र खराच आहे म्हणायचा. पण त्याचा इफेक्ट एकच महिना राहतो -( एकदम उमजते ) अरे! आता चिंता करायला नको. कसंबसं हे अकल्पितेचं लोढणं एक महिना सांभाळायचं - मग आपोआप ती सारं विसरुन जाऊन आपण तिला परके! .. .. एक महिन्यानंतर अकल्पितेचं आपल्यावरचं प्रेम उडून जाईल - तसंच अंबूच वसंतावरचं प्रेम सुध्दा! मग मी आणि माझी अरुणा ----( एकदम विचारात पडतो ) पण अरुणाला ताईताचा स्पर्श झाला असावा कां? की खरंच तिचं वसंतावर प्रेम असेल? त्याच्या पैशावर? तसं असेल तर ----( ताईताकडे पहात खचल्यासारखा खुर्चीवर

करतो. इतक्यात महाराज धावत पळत येतात. धापा टाकत पलंगावर बसतात. धाम पुसत )

**महाराज** : कुठं आहे ताईत?

**अनंता** : हा आहे माझ्याजवळ.

**महाराज** : मला द्या.

**अनंता** : कशाला?

**महाराज** : मंत्र उतरवून टाकतो.

**अनंता** : कां बरं?

**महाराज** : तो माझ्यावरच उलटला.

**अनंता** : काय म्हणताय? खरंच?

**महाराज** : मला माहित आहे. तुझा या मंत्रावर विश्वास नाही. पण मी प्रत्यक्ष भोगून राहिलो आहे ना त्याची फळं. जीव जायची वेळ आली.

**अनंता** : म्हणजे ॲक्च्युअली काय झालं?

**महाराज** : ती बाई गळा दाबायला निघाली माझा.

**अनंता** : कोणती बाई?

**महाराज** : (दरवाजाकडे बोट दाखवित) ती! ती!

**अनंता** : ऑ! तिथं तर कोणीच नाही. महाराज आपल्याला भ्रम तर झाला नाही ना?

**महाराज** : मी पूर्ण शुध्दीवर आहे. ती बाई आता तिथं नाही. पण मघाशी आली होती.

**अनंता** : मघाशीं आली होती? म्हणजे केव्हा?

**महाराज** : तुम्ही दोघं बाहेर पडला. मी ताईत मुठीत धरुन उलटा मंत्र टाकू लागलो. ताईत गरम होत होत इतका उष्ण झाला की मंत्र संपताच मला त्याचा पेटत्या निखाऱ्यासारखा चटका बसला. मी हात झटकला. ताईत नेमका त्या तिथे पडला अन् तितक्यात त्या बाई तिथं आल्या. अन् त्यांचा त्यावर पाय पडला. ----

**अनंता** : अन् त्यांनाही त्याचा चटका बसला!

**महाराज** : अरे नुसता चटका बसला असता तर मोठीशी बात नव्हती रे.

**अनंता** : मग?

**महाराज** :त्यांच्यावर त्या उलट्या मंत्राचा परिणाम झाला. त्यांच्या दृष्टीला प्रथम मी पडलो अन् मग----

**अनंता** : मग काय झालं? त्या तुमच्या गळयात पडल्या ---

**महाराज** :गळा दाबायला निघाल्या माझा.

**अनंता** : असं कसं होईल?

**महाराज** :मलाहि माहित नव्हता हा परिणाम. प्रेम नाहीसं करणारा मंत्र असा वैर उत्पन्न करुन प्रेम नाहीसं करतो हा अनुभव मला पहिल्यांदाच आला. मी पळूं लागतो --.त्या मागे लागल्या ---

**अनंता** : मागे लागल्या?

**महाराज** :अक्षरशः मागे लागल्या - मी रस्त्यातनं पळू लागलो. त्या मागे धावू लागल्या. लोक तमाशा पाहूं लागले. म्हणून टॅक्सी केली. तर त्यांनी ही टॅक्सीतून पाठलाग केला माझा. शेवटी एका बागेत शिरलो अन् त्यांना झुकांडी देवून थेट इथं आलो.

**अनंता** : ताईतासाठी?

**महाराज** :होय. त्या ताईतावरचा मंत्र निष्प्रभ केल्याशिवाय माझ्या मागचं हे ग्रहण सुटणार नाही. ( दाराजवळ जाऊन परत येतो. ) नाही! अजून नाही आल्या, -( अनंताला ) चांभारा कडली कातडी वहाण मिळेल काहो?

**अनंता** : कशाला?

**महाराज** :आता चांभारचौकशा करु नका. लवकर आणा ती यायच्या आंत! चांभारानं बनवलेल्या कातडी वाहाणेचं पाणी ताईतावर ओतलं की मंत्र निष्प्रभ होतो.

**अनंता** : इज् इट?

**महाराज** :येस! आण लवकर!

**अनंता** : चांभाराची वाहाण --- ( विचार करित ) बाटा किंवा ल्फेक्स कंपनीची नाही का चालणार?

**महाराज** :नाही! चांभाराची! कमावलेल्या कातड्याची, वापरलेली?

**अनंता** : चांभाराची? कमावलेल्या कातड्याची? वापरलेली? बघतो वसंताची कोणती आहे ती - ( दाराजवळ जातो ) आहे! वसंताची चप्पल तशीच आहे. ( अनंता चप्पल महाराजांना आणून देतो. )

**महाराज** :थोडं पाणी आणा - ( अनंता किचनमधून जगमध्ये पाणी आणतो. महाराज चप्पलेवर पाणी ओततात अन् त्याची धार ताईतावर सोडतात. निखाऱ्यावर पाणी ओतल्यासारखं संगीत )

**महाराज** : ( सुटकेचा श्वास सोडीत ) सुटलो ! आता कांही भीती नाही.

**अनंता** : भीती नाही ?

**महाराज** : मुळीच नाही !

**अनंता** : - दोन्ही मंत्र निकामी ?

**महाराज** :आता या ताईताला एका टिनाच्या पेटीपेक्षा जास्त किंमत नाही. ( अरुणा येते ) बापरे ! त्या बाई आल्या. अनंता मला वाचव. (अरुणाचं महाराजांकडे लक्ष नाही. ती अगदी नॉर्मल आहे .अनंतास उद्देशून)

**अरुणा** : अनंता ! कुठे होतास रे काल ? नाटकाला आला नाहीस ! तिकिट वाया गेलं (फुरंगटून बसते - अनंताच्या सारं लक्षात आलं आहे. तरी खात्री करुन घेण्यासाठी )

**अनंता** : अरुणा ! हे पहा ! यांना ओळखतेस ?

**अरुणा** : नाही ! कोण हे ? महाराज ! ( त्यांना वाकून नमस्कार करते अनंताला आनंदानं वेड लागायचं बाकी उरलं आहे तो ओरडतो. )

**अनंता** : वशा ! वशा ! अरे लौकर बाहेर ये ! इकडे पहा काय चमत्कार झाला आहे. अरे किती वेळ आंघोळ करशील ?

**वसंता** : ( बाहेर येत ) आता काय झालं ? कोण महाराज ! ( पाया पडतो. त्यांना कॉटवर नेऊन बसवतो ) महाराज ताईत वापरता आला नाही.

**महाराज** : ( गंभीर होत ) वसंता ! ऐक ! या फंदात पडू नकोस .हे दुधारी शस्त्र आहे. बुमरँग प्रमाणे फेकणाऱ्याच्याच अंगावर उलट येऊ शकते. तुला अकल्पितेचं प्रेम मिळालं नाही तर लौकिक मार्गानंच तिचं प्रियाराधन कर ! आम्ही चाललो. जय अलख निरंजन ( उठतात नि चालू लागतात. )

( वसंता कांही वेळ तिकडे आश्चर्यानंपाहात राहतो. इकडे अनंताचे व अरुणेचे प्रेमालाप चालू आहेत. )

**वसंता** : ( अनंताला ) महाराज गेले ?

**अनंता** : ( भानावर येत ) आम्ही पण जातो. चल अरुणा.

**अरुणा :** मी नाही यायची. प्रथम मी वसंताला विचारते - तू काल नाटकाला का आला नाहीस ते. तुझ्या थापांवर माझा विश्वास नाही.

**अनंता :** ( तिचा हात धरुन ओढत ) मी सारं कांही समजावून सांगतो --- वशा आम्ही जातो - तो ताईत निष्प्रभ झाला आहे. महाराजांनी केला. फेकून दे तो.

**वसंता :** निष्प्रभ केला म्हणजे?

**अनंता :** म्हणजे सुरळीत्त झालंय सगळं.

**वसंता :** कांही कळत नाही -- अरे ! जेवायला जायचं ना खाली.

**अनंता :** पोट भरलंय ओमचं ( दोघेही जातात )

( वसंता ते गेले त्या दिशेकडे कांही वेळ सुन्नपणे पहात राहतो . नंतर एक उसासा टाकून खाली पडलेला ताईत उचलतो. खिडकी बाहेर फेकून देतो. चपला जागच्या जागी ठेवण्यासाठी उचलून बाहेरच्या दाराकडे जातो तो दारात बाबासाहेब जोशी उभे )

**वसंता :** अं ! बाबासाहेब? याना ! आत या --- ( खुर्चीकडे बोट दाखवत) बसा ना. (बाबासाहेब खुर्चीवर बसतात) कसं काय येणं केलं गरीबाकडे?

**बाबासाहेब :** ( हसत ) वा ! वा वसंतराव ! छान जोक केला.

**वसंता :** ( गोंधळून ) जोक?

**बाबासाहेब :** तुम्ही आणि गरीब ! कमाल केलीत -- ( हसतात ) अहो, खरं म्हणजे गरीब आता आम्ही ! तुमच्या तुलनेनं.

**वसंता :** तुम्ही काय म्हणताहात मला कळलं नाही.

**बाबासाहेब :** लोचट–

**वसंता :** काय?

**बाबासाहेब :** लोचट माझ्याकडे सकाळी आले होते. सालीसीटर लोचट ! त्यांच्याकडून कळलं सारं मला - अभिनंदन !

**वसंता :** आभारी आहे ! पण लोचट तुमच्याकडे कसे काय आले?

**बाबासाहेब :** तुमचे काका म्हणजे आमचे लंगोटियार दोस्त - म्हणून सांगायला आले - जन्या असा अचानक कसा रे निघून गेलास ! ( डोळे पुसतात )

**वसंता** : ( डोक्यांत प्रकाश पडतो )अस्सं! म्हणजे यमुना जोशीचेहि वडील तुम्हीच कां? मृत्यूपत्रांत उल्लेख केलेली यमुना जोशी ....

**बाबासाहेब** : होय! माझी मुलगी. तुझ्या काकांचा तिच्यावर फार जीव होता - म्हणायचा सून करुन घेईन मोठी झाल्यावर.

**वसंता** : पण ते तर अविवाहित -----

**बाबासाहेब** : तुमच्या करिता मागणी घातली होती त्यानं!

**वसंता** : माझ्याकरिता! --- असं! असं! आलं लक्षात. पण काकांनी मृत्युपत्रात तशी स्पष्ट अट घातलेली नाहीय!

**बाबासाहेब** : त्यांना इकडची हाल हवाल पूर्ण माहित नव्हती. तुमचं लग्न आधीच झालं असलं तर इस्टेट मिळायला अडचण नको म्हणून तर तसं स्पष्ट कांहीच लिहलं नाही त्यानं - मनाचेमोठे होते फार तुमचे काका. तुमच्या मनाविरुध्द तुम्ही कोणत्याहि मुलीशी लग्न करावं असा त्याचा उद्देश नसावा. म्हणूनच फक्त तुम्ही लग्न करावं अशी मोघम अट त्यानं घातली असावी. तुमची इच्छा नसेल किंवा लग्न पक्कंझालं असेल किंवा तुमचं आधीच कुणावर प्रेम असेल तर माझं कांही म्हणणं नाही. ( उठू लागतात. त्यांना बसवित )

**वसंता** : थांबा बाबासाहेब! आपली निराशा करावी असा माझा उद्देश नव्हता --- पण --- पण ( घुटमळतो )

**बाबासाहेब** : पण काय वसंतराव! लोचट बोलले होते! अंबूशी ठरलंय म्हणून!

**वसंता** : छे छे ठरले नाही. ( एकदम निश्चय केल्याप्रमाणे ) माझं -- माझं अकल्पितेवर प्रेम आहे. ( इतक्यात अकल्पिता प्रवेश करते)

**अकल्पिता** : हॉय डॅड! यू आर हिअर? शोधून शोधून थकले अगदी! ( झटकन येऊन कॉटवर बसते )

**बाबासाहेब** : हया अकल्पितेवर तुमचं प्रेम आहे म्हणता?

( वसंता लाजत कसं बसं होय म्हणतो. बाबासाहेब खो खो करुन हसू लागतात. अकल्पिताही हसू लागते -- वसंता गोंधळतो. कांही बोलण्याचा प्रयत्न करतो. बाबासाहेब त्याला थांबण्याची खूण करतात. हसणं आवरतात. नंतर ---

**बाबासाहेब** : यमुने पसंत आहे ना तुला हा वसंता?

**अकल्पिता** :ओ डॅड! यू आर सो स्वीट ( त्यांच्या गळ्याला मिठी मारते)

**वसंता** : (थक्क ) म्हणजे हीच यमुना!

**बाबासाहेब** : जावईबापू! ही अकल्पिता जोशी म्हणजेच यमुना जोशी यमुना हे हिचे पाळण्यातलं नांव. हिच्या आजीनं ठेवलेलं! पणजीची आठवण म्हणून. आम्हा कोणालाच हे जुनाट नांव आवडलं नाही म्हणून आम्ही आमच्या आवडीच्या नावानं तिला हाक मारायला लागलो. अकल्पिता हेच प्रचारात आलं नंतर ----

**वसंता** : पण काकांनी मृत्यूपत्रात यमुना ----

**बाबासाहेब** : अरे! तुझ्या काकाला यमुनाच नांव आवडायचं! कारण ---कारण -- जिच्याकरिता तो आयुष्यभर अविवाहित राहिला तिचं नांवही यमुनाच होतं ----

**अकल्पिता** : डॅड! खरं सांगू? माझं याच्यावर आधीपासूनच प्रेम होतं. पण हा बावळट कांही पुढाकार घेईना.

**वसंता** : ( थक्क ) काय म्हणतेस?

**अकल्पिता** :मग काय? शेवटी मीच पुढाकार घेऊन आज सांगणार होते. इथं आले! पाहते तो हा प्रकार ---

**वसंता** : म्हणे आज सांगणार होती -- अग गधडे --- कालच आपलं मन उघडं केलं असतं तर इतकेघोटाळे झाले असते कां?

**अकल्पिता** :कसले घोटाळे?

**वसंता** : सारं सांगतो -- ( बाबासाहेब व अकल्पितेच्या जवळ जातो. कुजबूजून सांगतो. शेवटी हसण्याचा मोठा स्फोट -- नाना येतात. तिघांकडे आश्चर्यानं पाहतात. शेवटी बोलतात.)

**नाना** : जावईबापू! जेवायला चलता ना?

**बाबासाहेब** : नाना! जावईबापू तोच पण सासरा बदलला.

**वसंता** : होय नाना! हे माझे सासरे बाबासाहेब जोशी अन् ही माझी भावी पत्नी अकल्पिता ऊर्फ यमुना जोशी.

**अकल्पिता** :इश्य!

**नाना :** (आश्चर्यानं) पण हे घडलं कसं?

**बाबासाहेब :** हयाचं कारण या वशाचं वशीकरण! (सारे हसतात)

**नाना :** (दुःखानं) अंबू! अंबू आता तुला हे कसं सांगू?

**अंबू :** (दारामागून बाहेर येत) मी ऐकलंय नाना, सगळं.

(दारांत खाली मान घालून उभी असलेल्या अंबूकडे खचून पाहतात. सारे स्तब्ध. करुण स्वर उमटत असतांना पडदा पडतो)

(पडदा)

* * *